## अमरनाथ यात्रेकरूंच्या सुरक्षेत तैनात जवानावर हल्ला



**अनंतनाग :** अमरनाथ यात्रेकरूंच्या सुरक्षेत तैनात असलेले जम्मू-काश्मीर पोलीसमधील हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी यांच्यावर दहशतवाद्यांनी अचानक गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यात त्यांना वीरमरण आले. हा दहशतवादी हल्ला दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील लाल चौक परिसरात बुधवारी (दि.२२) दुपारी झाला. यानंतर संपूर्ण काश्मीर घाटीत सुरक्षा दलांनी हाय अलर्ट जारी केला असून एक हजारहून अधिक 'ओव्हर ग्राउंड वर्कर' आणि संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. वृत्तानुसार हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन हे अमरनाथ यात्रेकरूंच्या सुरक्षेवर तैनात होते. दहशतवाद्यांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांच्या जवानांनी ताबडतोब संपूर्ण लाल चौक परिसराची नाकाबंदी केली. हल्लेखोरांना पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ६

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ गुरुवार, २३ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग


वाशीत शनिवारी रंगणार 'गोष्ट वारीची'/२

स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण/५

पनवेलच्या फॉस्टिनाची 'सुवर्ण' कामगिरी/८


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वाढदिवशी पायी वारीमध्ये सहभागी

**सोलापूर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी (दि. २२) स्वतःच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सर्व राजकीय व औपचारिक सोहळे टाळून पंढरपूर वारीमध्ये पायी चालत सहभागी झाले. यावेळी त्यांनी सोलापूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले, आजच्या दिवशी वारीत चालण्याची आणि जगद्गुरु तुकाराम महाराज तसेच संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शन मिळणे हा अतिशय भाग्याचा योग आहे. वारकरी हे माऊलींचे जिवंत स्वरूप आहेत आणि त्यांचे सानिध्य मिळणे ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. माऊलींकडे काही मागण्याची गरज नसते. तरीही राज्यातील शेतकरी सुखी व्हावा आणि चांगला पाऊस पडावा, हेच साकडे मी घातले आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी



पंढरपूर वारीच्या नियोजनाचे कौतुक केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यंदाच्या वारीतील गर्दीचा अंदाज घेतला जात असून यंदाच्या वारीने सर्व जुने विक्रम मोडल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हा प्रशासनाने केलेल्या स्वच्छतेच्या व आरोग्य सुविधांच्या नियोजनामुळे वारकऱ्यांची सोय झाली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

## विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय स्वार्थासाठी काही पक्षांकडून देशाची बदनामी!

"विद्यार्थ्यांच्या आशा, आकांक्षा आणि अपेक्षा पूर्ण करणे हे सरकारचे कर्तव्य असून केंद्र व राज्य सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचेच निर्णय घेईल, मात्र विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय स्वार्थासाठी काही पक्ष देशाची बदनामी करत आहेत, हे अयोग्य आहे," अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ते म्हणाले की, सर्वांनी सर्वप्रथम देशाचा विचार केला पाहिजे. परीक्षा किंवा शिक्षण व्यवस्थेत काही उणिवा राहिल्या असतील, तर त्या दूर केल्या जातील आणि सरकार विद्यार्थ्यांच्या मागण्यांशी पूर्णपणे समरस आहे, मात्र या मुद्द्याचे राजकारण करून देशाची बदनामी करणे योग्य नाही.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

### देवाभाऊंच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये शिबिरास प्रतिसाद

### आमदार प्रशांत ठाकूर यांनीही दिले योगदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे अष्टपैलू, कार्यकुशल, विकासाभिमुख आणि लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध समाजोपयोगी उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहेत. यानिमित्ताने पनवेलमध्ये भाजप पूर्व मंडळाच्या वतीने बुधवारी (दि.२२) आयोजित भव्य रक्तदान शिबिरात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी रक्तदान करून समाजसेवेचा प्रेरणादायी संदेश दिला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाची नवी उंची गाठली असून पायाभूत सुविधा, उद्योग, गुंतवणूक, रोजगार, शेती, महिला सक्षमीकरण आणि सुशासन अशा प्रत्येक क्षेत्रात राज्याने उल्लेखनीय प्रगती केली आहे. राज्यातील महिला त्यांना प्रेमाने 'देवाभाऊ' म्हणून संबोधतात, तर पायाभूत सुविधांच्या विकासाला दिलेल्या अभूतपूर्व गतीमुळे त्यांची 'विकसित महाराष्ट्राचे इन्फ्रा मॅन' अशी ओळख निर्माण झाली आहे.

महाराष्ट्राला २०४७पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासमोर 'विकसित महाराष्ट्र २०४७' हा दूरदर्शी विकास आराखडा मांडला आहे. जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानातील वेगवान बदल, हवामान बदल, वाढते शहरीकरण आणि बदलत्या आर्थिक आव्हानांचा विचार करून तयार करण्यात आलेला हा आराखडा केवळ आर्थिक विकासापुरता मर्यादित नसून रोजगारनिर्मिती, उद्योगविकास, आधुनिक शेती, तंत्रज्ञान, पर्यटन, महिला सक्षमीकरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, मजबूत पायाभूत सुविधा आणि पारदर्शक सुशासनाचा व्यापक संकल्प आहे. पुढील पिढ्यांसाठी समृद्ध, सक्षम, आधुनिक आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्याची ताकद या व्हिजनमध्ये आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भाजप पूर्व मंडळाच्या वतीने मंडळ अध्यक्ष तथा पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुकापूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात आमदार प्रशांत ठाकूर यांनी रक्तदान करून मुख्यमंत्र्यांच्या समाजहिताच्या विचारांना कृतीतून शुभेच्छा दिल्या. त्यांच्या प्रेरणेने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. दुपारपर्यंत ७३ जणांनी रक्तदान केले.

शिबिरास पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, प्राची जाधव, कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, वर्षा केवारे, वैशाली सावंत, योगिता लहाने, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, **(पान २ वर..)**

# शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांची पहिली प्रातिनिधिक यादी जाहीर करण्यात आली. या पहिल्या टप्प्यात राज्यातील सहा जिल्ह्यांतील निवडक ५०० पात्र लाभार्थ्यांची नावे समाविष्ट आहेत, अशी माहिती सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी बुधवारी (दि.२२) दिली.

राज्य मंत्रिमंडळाच्या २ जून रोजी झालेल्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर १५ जुलै रोजी शासन निर्णयात सुधारणा करत योजनेची अंमलबजावणी अधिक पारदर्शक करण्यात आली. या योजनेसाठी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयकृत बँका आणि खासगी बँकांसह एकूण ५३ बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती 'महाआयटी'द्वारे विकसित पोर्टलवर अपलोड केली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सर्व खात्यांचे लेखापरीक्षण सहकार विभागाच्या लेखापरीक्षकांकडून पूर्ण करण्यात आले आहे.



**बँकेत जमा होणार रक्कम**

राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीसाठी ३६,५८५ कोटींची भरीव तरतूद केली आहे. या माध्यमातून ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली जाईल.

बनावट किंवा अपात्र व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळू नये यासाठी प्रशासनाने कठोर निकष लागू केले आहेत. आजी-माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणारे व्यक्ती तसेच डीसीसीबी, नागरी बँका, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या व बाजार समित्यांचे पदाधिकारी-कर्मचारी यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. संबंधित संस्थांकडून अपात्र घटकांची माहिती पोर्टलवर संकलित करून संगणकीय प्रक्रियेद्वारे केवळ पात्र शेतकऱ्यांची अंतिम यादी तयार करण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे.

## निवडक

### सिक्कीममध्ये बोगद्यात भूस्खलन; २० जणांचा मृत्यू

**गंगटोक :** सिक्कीममधील नामची जिल्ह्यात एनएचपीसीच्या तीस्ता स्टेज-६ जलविद्युत प्रकल्पाच्या निर्माणाधीन बोगद्यात भूस्खलन होऊन २० जणांचा मृत्यू झाला. ढिगाऱ्याखाली आणखी कामगार अडकल्याची शक्यता असून शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. या दुर्घटनेत मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी निलंबित

**नवी दिल्ली** : संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यावर महिला खासदारांबद्दल असंसदीय भाषेचा वापर केल्याचा आरोप आहे. बॅनर्जी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव बुधवारी (दि.२२) मंजूर होऊन लोकसभा तालिकाध्यक्षांनी उर्वरित अधिवेशनासाठी त्यांना निलंबित केले आहे.

## आषाढी यात्रेसाठी पोलिसांची सज्जता

### एआय ड्रोन, एअर ॲम्ब्युलन्ससह अत्याधुनिक साधनांचा वापर

**सोलापूर : प्रतिनिधी**

राज्यातील सर्वांत मोठ्या आषाढी वारीसाठी सोलापूर पोलिसांनी संपूर्ण तयारी पूर्ण केली आहे. पालखी मार्गासह आषाढी वारीत १० हजार पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. त्यांच्या सोबतीला सीसीटीव्ही, ड्रोन, वॉकीटॉकीसह इतर अत्याधुनिक साधने राहणार आहेत. प्रशासनाच्या वतीने एक कंट्रोल रूम उभारण्यात आली असून त्याद्वारे सर्व विभागांना नियंत्रित करण्यात येणार आहे.

यंदाच्या आषाढी वारीत एअर ॲम्ब्युलन्सची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. वारीत सुमारे २५ लाखांपेक्षा अधिक वारकरी पंढरपुरात दाखल होतात. त्यांच्या सुरक्षेसाठी १० हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त ठेवला आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही ड्रोन व एआयची मदतही घेतली जाणार आहे. त्याचबरोबर बीडीडीएस पथकही तैनात करण्यात आले आहे.

#### विद्यार्थी, स्वयंसेवकही मदतीला

*वारीसाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देण्यात आले आहे. एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी तसेच ग्राम सुरक्षा यंत्रणा, स्वयंसेवक यांची मदत घेतली जाणार आहे. अत्याधुनिक यंत्रणा उभारून वारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कंट्रोल रूम उभारले आहे. सुरक्षित वारी करण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे.*

सोलापूर जिल्ह्यासह ठाणे, धाराशिव, सातारा, सांगली, परभणी, पुणे सिटी, लातूर यासह इतर जिल्ह्यातील बीडीडीएस पथक वारीत तपासणी करीत आहे. प्रत्येक बीडीडी पथकात एका श्वानासह एक हँडलर, दोन टेक्निशियन आणि इतर पोलीस मदतीला राहणार आहेत. या टीमला वेगवेगळ्या ठिकाणी तपासणीसाठी ठेवण्यात आले आहे. गर्दीवर नियंत्रणासाठी होल्ड अँण्ड रिलीज टेक्निक वापरण्यात येणार आहे.

### खोपोली वीरेश्वर मंदिरातील चोरी प्रकरण

## चार जणांना अटक; मुद्देमाल जप्त

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहराचे श्रद्धास्थान असलेल्या पेशवेकालीन वीरेश्वर मंदिरात चोरी करणाऱ्या चार आरोपींना अवघ्या ४८ तासांत जेरबंद करण्यात खोपोली पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत चोरीतील मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

वीरेश्वर मंदिरात १९ जुलै रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास ही चोरी झाली होती. चोरट्यांनी महादेवाच्या पिंडीवरील सुमारे १७ किलो वजनाचे चांदीचे आच्छादन चोरून नेले. या घटनेमुळे खोपोली शहरात खळबळ उडाली होती. याप्रकरणी अमोल सुरेश कसबे (३६), विलास साहेबराव आगीवले (२५, दोघेही शिरूर, जि. पुणे) तसेच दिलीप राजू जाधव (४०) आणि सखाराम छबन गायकवाड (४०, दोघेही पारनेर, जि. अहिल्यानगर) यांना अटक करण्यात आली आहे.



चोरीची संपूर्ण घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती, मात्र मंदिराबाहेरील काही सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे आरोपी कोणत्या दिशेने पसार झाले याचा माग काढण्याचे पोलिसांसमोर आव्हान होते. दरम्यान, रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत आवश्यक सूचना केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल पाटील आणि खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू करण्यात आला.

या प्रकरणाच्या तपासासाठी एकूण आठ तपास पथकांची स्थापना करण्यात आली होती. चोरी केल्यानंतर आरोपींचे वाहन कर्जतच्या दिशेने गेल्याचे सीसीटीव्ही फुटेज आणि फास्टॅग प्रणालीद्वारे निष्पन्न झाले. त्यानंतर तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी शिरूर (पुणे) आणि पारनेर (अहिल्यानगर) येथून चार आरोपींना अटक केली.

आरोपींकडून चोरीतील चांदीचे आच्छादन आणि अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या गुन्ह्यात आणखी काही जण सामील आहेत का याचा तपास सुरू आहे.





**खोपोली : येथील झेनिथ वॉटरफॉलच्या वरील बाजूच्या धोकादायक भागात सुमारे २०० फूट उंच कड्यावर चढून चार तरुण मजामस्ती करीत असल्याचे दृश्य बुधवारी सायंकाळी समोर आले होते. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी या तरुणांना सुरक्षित खाली उतरवून सज्जड दम देत घरी पाठविले. तरुणांनी असे धाडस करू नये, असे यावेळी सूचित करण्यात आले.**

## कारगिल विजय दिनानिमित्त वीरसैनिक, वीरपत्नींचा कृतज्ञता सन्मान सोहळा


**मुंबई : प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने कारगिल विजय दिवसानिमित्त कारगिल युद्धातील महाराष्ट्रातील वीरसैनिक, वीरपत्नी, वीरमाता तसेच दिव्यांग सैनिक यांच्या राष्ट्रसेवेतील अद्वितीय शौर्य, त्याग आणि अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वीरसैनिक व वीरसैनिकांच्या वीरपत्नींचा कृतज्ञता सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा २७ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता मुंबईतील लोकभवन येथे होणार आहे.

कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर सन १९६२मध्ये महान गीतकार कविवर्य प्रदीप यांनी रचलेली आणि संगीतकार सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेली वीरनारी व वीरमातांना समर्पित ऐतिहासिक देशभक्तिपर रचना स्वराधीश डॉ. भरत बलवल्ली यांनी नव्याने स्वरबद्ध केली आहे. या रचनेतून राष्ट्रभक्ती, शौर्य आणि त्यागाच्या भावनेला उजाळा देण्यात येणार आहे.

भारतीय सशस्त्र दलाच्या अदम्य शौर्य, पराक्रम, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेला अभिवादन करणारी देशभक्तिपर सांगीतिक प्रस्तुतीही या कार्यक्रमात सादर करण्यात येणार आहे.

## 'भगव्या दहशतवादा'च्या फेक नॅरेटिव्हचा पर्दाफाश



ज्यांचा हा देश आहे त्या हिंदूंनाच देशात दहशतवादी ठरवण्याचे षड्यंत्र कसे रचले गेले, याची कहाणी वाचा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सुरक्षा विभागाचे माजी अवर सचिव आर.व्ही.एस. मणी यांच्या मुलाखतीतून... सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून राष्ट्रीय सुरक्षेला धाब्यावर बसवणाऱ्या काँग्रेस राजवटीचे हे कारस्थान या मुलाखतीतून उघड झाले आहे. 'एएनआय'च्या स्मिता प्रकाश यांनी घेतलेली ही मुलाखत संपादित स्वरूपात 'मुंबई तरुण भारत'ने प्रकाशित केली आहे. ती आम्ही 'रामप्रहर'च्या वाचकांसाठी येत्या रविवार, २६ जुलैपासून पाच भागांमध्ये रोज सलग प्रसिद्ध करणार आहोत.



# उद्योगांच्या सीएसआरमधून विकसित महाराष्ट्र २०४७ला बळ -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सर्वसमावेशक विकास धोरणाला उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रभावी साथ लाभत आहे. शासन आणि उद्योग क्षेत्राच्या भागीदारीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होत असून अशा उपक्रमांमुळे 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या ध्येयाला बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांना पूरक ठरणारे उद्योगांचे सीएसआर उपक्रम ग्रामीण नागरिकांच्या जीवनमानात



सकारात्मक बदल घडवत आहेत. आरोग्य, पोषण, जलसुरक्षा, पर्यावरण, क्रीडा आणि शालेय पायाभूत सुविधा या क्षेत्रांतील सातत्यपूर्ण काम समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. मोंडेलेज इंडियाच्या 'शुभ आरंभ' या प्रमुख सामाजिक उपक्रमांतर्गत गेल्या १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ आणि खेड तालुक्यातील ६० गावांमध्ये आरोग्य, पोषण, शिक्षण, जलसंधारण, पर्यावरण, क्रीडा आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामुळे हजारो कुटुंबांच्या जीवनात बदल झाला असून शासकीय योजनांनाही पूरक बळ मिळाले आहे.

आयुष्मान भारत अभियानाशी सुसंगत ५० हेल्थ अँड वेलनेस सेंटरचे आधुनिकीकरण करण्यात आले. ॲनिमियामुक्त भारत अभियानांतर्गत पाच हजार उच्च जोखमीच्या गर्भवती महिला आणि एक हजारांहून अधिक पाच वर्षांखालील बालकांना उपचारासाठी संदर्भित केले. 'खेलो इंडिया'शी सुसंगत 'शुभ आरंभ स्पोर्ट्स फॉर एक्सलन्स' उपक्रमातून फुटबॉल, कबड्डीसाठी प्रशिक्षण देण्यात आले. गेल्या दशकात सुमारे नऊ हजार विद्यार्थी लाभार्थी, त्यापैकी ५० टक्के मुली, १० क्रीडांगणे विकसित करण्यात आली.

दरम्यान, शाळांमध्ये २७ आरओ यंत्रणा, १२ स्वच्छतागृहे, संरक्षक भिंती उभारल्या. ६० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प आणि विविध वाड्यांमध्ये सौर पथदिवे बसविल्याने वीज खर्चात बचत आणि सुरक्षितता वाढली. पुणे, सिंधुदुर्ग, मुंबईतील २३५ शाळांमधील ६० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोषण शिक्षण पोहोचवले. पुढील दोन वर्षांचा आराखडा आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, हेल्थ सेंटरची गुणवत्ता वाढविणे, ग्रामीण क्रीडासाठी प्रगत प्रशिक्षण, नवीन जलसंधारण प्रकल्प यावर भर दिला जाणार आहे. शासकीय योजनांशी समन्वय साधत आरोग्य, शिक्षण, जलसुरक्षा आणि जीवनमानात शाश्वत सुधारणा घडवणे हे उद्दिष्ट आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## 'टॅक्सीचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर-तळोजा परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या टॅक्सीचालकांनी प्रवाशांशी सौजन्याने वागताना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन वाहतूक पोलीस अधिकारी भरत थिटे यांनी केले आहे.

तळोजा येथील शीघ्र कृती दल परिसरापासून खारघरमधील बेलपाडा भागापर्यंत मोठ्या प्रमाणात टॅक्सी सेवा सुरू आहे. दररोज शेकडो प्रवासी या सेवेचा लाभ घेतात, मात्र काही टॅक्सीचालक टाटा मेमोरियल रुग्णालय दिशेने जाताना खारघर सेक्टर-६ येथील सर्व्हिस रोडचा वापर करत असल्याच्या तक्रारी वाहतूक विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर भरत थिटे यांनी टॅक्सी चालकांची बैठक घेऊन त्यांना वाहतूक नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीत भरत थिटे यांनी टाटा हॉस्पिटलकडे आणि बेलपाडा येथे प्रवासी घेऊन जाताना खारघर-तळोजा या मुख्य रस्त्यानेच वाहतूक करावी, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच वाहन चालविताना वेगमर्यादेचे पालन करावे. धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक करू नये. वाहतूक कोंडी निर्माण होऊ देऊ नये आणि सर्व प्रवाशांशी सौजन्याने वागावे. मद्यप्राशन करून वाहन चालवू नये. वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे. सुरक्षित आणि जबाबदारीने वाहन चालवून अपघात टाळावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

# पेणमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर; मान्यवरांची उपस्थिती

**पेण : रामप्रहर वृत्त**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून पेण येथील गणपतीवाडी येथील मराठा समाज हॉलमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात संपन्न झाले. महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याबरोबरच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास आमदार रविशेठ पाटील, माजी खासदार धैर्यशील पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, कृषी सभापती वैकुंठ पाटील, पेण नगराध्यक्ष प्रीतम पाटील, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार तानाजी शेजाळ, सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव मानकर तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत विविध महसुली दाखले, तुकडेबंदी व तुकडेजोड प्रकरणांतील ७/१२ उतारे, कुल कायद्यांतर्गत ३२-एम प्रमाणपत्रे, संजय गांधी व इंदिरा गांधी निराधार योजनांतील लाभार्थ्यांना अनुदान, नैसर्गिक आपत्तीत मृत झालेल्या जनावरांसाठी आर्थिक सहाय्य, प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचे लाभ, अंध व अपंग कल्याण निधी योजनेंतर्गत सहाय्य, प्रधानमंत्री आवास योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, घरकुल योजना, आयुष्मान भारत आरोग्य कार्ड तसेच स्वामित्व योजनेअंतर्गत मालकी सनदांचे वितरण करण्यात आले.

शिबिरामध्ये सातबारा, ८-अ उतारे, ग्रामपंचायत अभिलेख, महसुली दाखले, फेरफार, स्वामित्व योजना, जमीन अभिलेख तसेच विविध महसुली सेवांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. अनेक प्रकरणांचा जागेवरच निपटारा करून नागरिकांना तात्काळ सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाभर विशेष महसूल सेवा अभियान राबविण्यात येत असून या अभियानाअंतर्गत एक लाखाहून अधिक नागरिकांना विविध महसुली सेवांचा लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शासनाच्या निर्णयांचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचविणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून, त्यासाठी महसूल विभाग प्रभावीपणे कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या स्वामित्व योजनेमुळे गावठाणातील मालमत्ताधारकांना मालकी हक्काची सनद उपलब्ध होत असून त्याआधारे बँकांकडून कर्ज मिळणे सुलभ झाले आहे. रायगड जिल्ह्यातील सुमारे १,४०० गावांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, त्यापैकी सुमारे १,१०० गावांतील स्वामित्व सनदांचे वितरण करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

तसेच तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रलंबित फेरफार निकाली काढणे, पाणंद रस्त्यांबाबतचे प्रश्न मार्गी लावणे, घरबांधणीसाठी अनावश्यक एन.ए. परवानगीची आवश्यकता रद्द करणे, शेतकरी व ग्रामस्थांना शेती व घरगुती कामांसाठी लागणाऱ्या वाळू, माती व मुरूमवरील रॉयल्टीत सवलत देणे तसेच घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू उपलब्ध करून देणे यांसारखे महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतले असून, या निर्णयांमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुलभ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात आमदार रविशेठ पाटील, माजी खासदार धैर्यशील पाटील, कृषी सभापती वैकुंठ पाटील तसेच नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी मनोगत व्यक्त करून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले. शिबिराला पेण तालुक्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध महसुली सेवा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# अपंगांसाठीच्या दुकानांचा गैरवापर

## खारघरमध्ये गुटखा साठा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

अपंग व्यक्तींच्या सहाय्यासाठी दिलेल्या दुकान परवान्यांचा गैरवापर होत असल्याचा प्रकार खारघरमध्ये उघड झाला आहे. खुटूकबांधण गावाच्या प्रवेशद्वाराजवळील एका अपंग व्यक्तीच्या नावे असलेल्या दुकानावर रविवारी खारघर पोलिसांनी छापा टाकून प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला. पोलिसांनी केलेल्या कारवाईत २० वर्षीय माताप्रसाद निशाद हा व्यक्ती हे दुकान चालवत असल्याचे आढळले.

तपासादरम्यान विक्रीसाठी ठेवलेला नऊ हजार ८३० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी माताप्रसाद निशाद याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुकानावर 'पनवेल महापालिका हद्दीतील अपंग व्यक्ती पोलिओ आदिल ए. रौफ' असा फलक लावण्यात आला होता, मात्र प्रत्यक्षात संबंधित अपंग व्यक्ती हा व्यवसाय चालवत नसल्याचे पोलिसांच्या कारवाईत स्पष्ट झाले.

त्यामुळे अपंगांच्या नावाने मिळालेली दुकाने इतरांना भाड्याने देण्याचा प्रकार उघड झाला आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अमली पदार्थ आणि प्रतिबंधित गुटखा विक्रीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना दिल्यानंतर शहरात अशा कारवाया वाढल्या आहेत. अपंगांसाठीच्या योजनांचा गैरवापर रोखण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र पडताळणी मोहीम राबवून प्रत्येक वॉर्डात बीट मार्शल नेमण्याची मागणीही पुढे येत आहे.

**संबंधित टपरीधारकाला पनवेल महापालिकेने परवाना दिला की नाही याबाबत तातडीने पडताळणी करण्याची सूचना नावडे अधीक्षकांना देण्यात आली आहे. पडताळणीमध्ये जे तथ्य आढळेल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.**

**-रविकिरण घोडके, उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण विभाग**

## उलवेत भटक्या श्वानावर अनैसर्गिक अत्याचार; अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

पनवेल : वार्ताहर

उलवे परिसरात एका विकृत व्यक्तीने मादी कुत्रीवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उलवे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.




ही घटना उलवे, सेक्टर-२३मधील सिद्धिविनायक प्लॅटिनम इमारतीच्या गेटला लागून असलेल्या अमृततुल्य दुकानाच्या शटरजवळ घडली.

३० ते ३५ वर्षे वयाच्या अज्ञात विकृत व्यक्तीने पांढऱ्या आणि चॉकलेटी रंगाच्या मादी श्वानावर अनैसर्गिक अत्याचार केले. सदर प्रकार त्या भागात राहणाऱ्या एका महिला वकिलाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी उलवे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात विकृताविरोधात जी.एन.एस. कलम ३२५ आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६०चे कलम १(१) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे प्राणीप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाची मासिक सर्वसाधारण बैठक राजेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २२) पनवेलच्या शासकीय विश्रामगृह येथे झाली. आगामी पर्यावरणपूरक कार्यक्रम व नियोजनाबाबत बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सदस्य लालचंद यादव यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने केक कापण्यात आला. विकास मंचाने आगामी काळात पर्यावरणपूरक कार्यक्रम हाती घेतले आहेत. इको फ्रेंडली गणेश, वृक्ष संवर्धन, वृक्षवाटप आदी कार्यक्रमांच्या नियोजनासंदर्भात चर्चा झाली. वर्षासहलीचे नियोजनही बैठकीत करण्यात आले. या बैठकीला अध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस हरेश साठे, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, निलेश सोनावणे, प्रवीण मोहोकर, लालचंद यादव यांची उपस्थिती होती.



पान १ वरुन

## रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

किशोर सुरते, सरपंच प्रमोद भिंगारकर, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, विश्वास भगत, माजी सरपंच रमेश पाटील, अनेश ढवळे, विलास शेळके, विश्वजित पाटील, महेश पाटील, राजेश माळी, मुकेश फडके, शरद गायकर, प्रशांत गांगुर्डे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरातून समाजाप्रति असलेली बांधिलकी, सेवा आणि समर्पणाची भावना अधोरेखित झाली. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार असून देवाभाऊंच्या वाढदिवसाचे औचित्य समाजसेवेच्या माध्यमातून साजरे करण्याचा हा उपक्रम विशेष ठरला.

# ऊर्जा क्षेत्रातील योगदानाबद्दल महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचा राष्ट्रीय परिषदेत विशेष गौरव

**मुंबई : प्रतिनिधी**

नवीकरणीय ऊर्जेचा स्वीकार, ऊर्जा कार्यक्षमता आणि दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी वीज वितरण क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा बुधवारी (दि. २२) विशेष गौरव करण्यात आला.

नवी दिल्ली येथे आयोजित 'टाइम्स नेटवर्क सस्टेनेबिलिटी कॉन्क्लेव्ह' (Times Network Sustainability Conclave) 'भारत २०३५: एक आत्मनिर्भर राष्ट्र' या संकल्पनेवर आधारित या कॉन्क्लेव्हमध्ये २०३५ पर्यंत भारत हरित बांधिलकी आणि शाश्वत ऊर्जेच्या बळावर आत्मनिर्भर कसा बनू शकतो यावर विचारमंथन करण्यात आले. या परिषेदत ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांची विशेष मुलाखत घेण्यात आली.

महाराष्ट्राला स्वच्छ आणि हरित ऊर्जेकडे नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना व प्रकल्प राबवले जात आहेत. हरित ऊर्जा परिवर्तनातून सर्वांना स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासह वीज क्षेत्रातील आमुलाग्र सुधारणांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी वेग दिला आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी ऊर्जा परिवर्तनासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. तर या आराखड्याच्या अंमलबजावणीला मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सक्रीय वेग दिला आहे.

महाराष्ट्राच्या वीज नियोजनात २०३० पर्यंत आणखी ४५ हजार मेगावॉट विजेची क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ३८ हजार मेगावॉट वीज ही हरित स्रोतांकडून मिळवून एकूण ऊर्जेतील नवीकरणीय ऊर्जेचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे ध्येय आहे. त्यास अनुसरून महावितरणने स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के हरित ऊर्जेचा समावेश केला आहे.

सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०च्या माध्यमातून सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांतून १६ हजार मेगावॉट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले. सध्या ५ हजार ५०० मेगावॉटपेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील १५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सध्या दिवसा वीज पुरवठा मिळत आहे.

# वाशीत शनिवारी रंगणार 'गोष्ट वारीची'

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत श्री विश्वमाऊली वारकरी सेवा संस्थेच्या वतीने 'गोष्ट वारीची' या विशेष सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवारी (दि. २५) सकाळी १०.३० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून वारकरी, भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा, संतांचा विचारवारसा, वारीचा इतिहास आणि तिचे सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व यांचा उलगडा कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. यासोबतच पारंपरिक भजन, हरिपाठ, विठ्ठलनामाचा गजर तसेच टाळ-मृदंगाच्या सुरेल साथीने सादर होणारे भक्तिसंगीत उपस्थितांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव देणार आहे. वारकरी संप्रदायातील समता, बंधुभाव, सेवा, भक्ती आणि अध्यात्म या मूल्यांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे तसेच नव्या पिढीपर्यंत संतपरंपरेचे संस्कार पोहोचविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे संस्थेने सांगितले.

याविषयी माहिती देताना श्री विश्वमाऊली वारकरी सेवा संस्थेचे प्रमुख डॉ. जितेंद्र सूर्यवंशी म्हणाले की, वारी ही केवळ पंढरपूरपर्यंतचा प्रवास नसून ती माणुसकी, समता, सेवा आणि भक्तीचा जीवनमार्ग आहे. 'गोष्ट वारीची' कार्यक्रमाच्या माध्यमातून वारकरी परंपरेचा समृद्ध वारसा समाजापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून नागरिक, युवक, महिला आणि वारकरी बांधवांनी कुटुंबासह उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा.

# रायगड जिल्ह्यातील ५५० शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप



**उरण : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने उरण तालुक्यातील खोपटे येथे आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील ५५० शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मत्स्यपालन क्षेत्राचा विकास हा रायगड जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा असून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण, वित्तीय सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले. रायगड जिल्ह्याला १२ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला असून मत्स्य उत्पादन वाढविण्याची मोठी क्षमता आहे. जिल्ह्याचा मोठा भूभाग डोंगराळ व जंगलव्याप्त असल्याने पारंपरिक शेतीच्या विस्ताराला मर्यादा आहेत. त्यामुळे सागरी तसेच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाला चालना देऊन शेतकऱ्यांना उत्पन्नाचा शाश्वत पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील साडेपाचशे शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वितरण करण्यात आले असून त्यांना पूर्वप्रशिक्षणही देण्यात आले आहे. आगामी काळात मत्स्यपालनाचे तंत्रज्ञान, खाद्य व्यवस्थापन, रोगनियंत्रण, उत्पादन व्यवस्थापन, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि विपणन याबाबत तालुकानिहाय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच शेततळे व बायोफ्लॉक तंत्रज्ञानालाही प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

मुंबई महानगर प्रदेश, जेएनपीए आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे मत्स्य उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. प्रक्रिया उद्योग व निर्यातीच्या माध्यमातून या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीची संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिल्हाधिकारी जावळे यांनी सागरी मच्छीमारांच्या आर्थिक अडचणींचा उल्लेख करताना सांगितले की, मासेमारीसाठी आवश्यक भांडवल उपलब्ध नसल्यामुळे अनेक कोळी बांधवांना खासगी सावकारांकडून जादा व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रमुख कोळीवाड्यांमध्ये बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. अलिबाग तालुक्यातील अक्षी येथे बँक ऑफ बडोदाची शाखा सुरू करण्यात आली असून भविष्यात जिल्ह्यातील इतर प्रमुख कोळीवाड्यांमध्येही अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

रायगड जिल्ह्याचा 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' म्हणून सागरी मत्स्य उत्पादनाचा समावेश करण्यात आला आहे. उत्पादनवाढ, मूल्यवर्धन आणि निर्यात वाढीसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन शेवटी जिल्हाधिकारी जावळे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी प्रस्ताविकात उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. 'आत्मा' प्रकल्पांतर्गत मत्स्यबीज उपलब्ध करून देण्यात आले असून लाभार्थी शेतकऱ्यांना मत्स्यपालनाबत प्रशिक्षणही देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम, तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ, चिरनेर पंचायत समिती गणातील सदस्य कविता पाटील, आवरे पंचायत समिती गणातील सदस्य प्रारंभी गावंड, तारपोवाला सागरी जीवशास्त्र केंद्राचे डॉ. भरत यादव, डॉ. रवींद्र बोंद्रे तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरणमध्ये भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस व माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी उरणच्या वतीने व उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर बुधवारी (दि.२२) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत उरण तालुक्यात चार ठिकाणी ठेवण्यात आले होते.

तेरा पंथ हॉल, वाणी आळी उरण, करंजा मच्छीमार सोसायटी करंजावरील हॉल, जेएनपीटी, मल्टीपर्पज हॉल टाऊनशिप, आणि पी. पी. खारपापाटील हायस्कूल, चिरनेर, ता. उरण येथे शिबिर झाले. रक्तदान म्हणजे श्रेष्ठदान होय. सर्वांनी रक्तदान करावे, अशी विनंती आमदार महेश बालदी यांनी यावेळी केली. तेरापंथी हॉल उरणमध्ये १५०, करंजा मच्छीमार सोसायटी करंजा येथे ६५, जेएनपीटी टाऊनशिप येथे ७० आणि पी. पी. खारपाटील हायस्कूल, चिरनेर येथे ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिरास आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपनगराध्यक्ष रवी भोईर, उरण शहर भाजप अध्यक्ष कौशिक शाह, गटनेते जयविन कोळी, भाजप उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, उ. रायगड उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, महालण विभागाध्यक्ष महेश कडू, जिल्हा सदस्य सुनील पाटील, नगरसेवक राजेश ठाकूर, जसिम गॅस, गणेश पाटील, रोहित पाटील, नगरसेविका सायली पाटेकर, स्वीकृत नगरसेवक पराग म्हात्रे, नगरसेविका सायली म्हात्रे, दमयंती म्हात्रे, रजनी कोळी, रिबेका मढवी, उरण ता. भाजप उपाध्यक्ष मुकंद गावण, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, नगरसेविका पूर्वा वैवडे, भाजप उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, जिप सदस्य विजय भोईर, हितेश शाह, विशाल पाटेकर, हस्तीमल मेहता, सीमा घरत, माजी सरपंच राजेंद्र पडते, राजेश पटेल, सुनील पेडणेकर, राज ठाकूर, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल पालिकेत स्व. अजित पवार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. २२) पनवेल महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, तसेच महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राजकारणातील अष्टपैलू नेतृत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्व. अजित पवार यांनी संपूर्ण राजकीय व सामाजिक जीवनात कायमच सर्वसामान्य जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विशेषतः कृषी, सहकार, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागातील सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी त्यांनी घेतले निर्णय मैलाचा दगड ठरले. त्यांच्या कार्यातून समाजसेवा, विकास आणि लोककल्याणाची प्रेरणा पुढील पिढ्यांना मिळत राहील, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# फुंडेतील वाजेकर विद्यालयात स्व. अजित पवार यांना आदरांजली



**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. बुधवारी (दि. २२) आयोजित या कार्यक्रमाला रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मोहन कोंगेरे यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या जीवनकार्याचा, शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा तसेच त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा सविस्तर परिचय करून दिला. रयत शिक्षण संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन शिक्षणाबरोबरच समाजसेवा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि नेतृत्वगुण यांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर तथा दि रयत सेवक को-ऑप. बँक लि., सातारा यांचे संचालक प्रा. किशोर पाटील यांनी स्व. अजितदादा पवार यांचे रयत शिक्षण संस्थेप्रति असलेले योगदान विशद केले. स्व. अजितदादा पवार हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाच्या सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उमदे नेतृत्व होते. त्यांच्या अकाली निधनामुळे शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

# गव्हाण येथील विद्यालयात स्व. अजित पवारांना अभिवादन

**गव्हाण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे या सर्व मान्यवरांच्या हस्ते अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर स्व. अजितदादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी प्रतिमेस श्रीफळ वाढविले.

यावेळी आठवी ब मधील कु. आरोही नाळे या विद्यार्थिनीने स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचे वर्णन करणारी एक सुंदर कविता सादर केली, तर इयत्ता नववी ब मधील स्मित मोकल या विद्यार्थ्याने त्याच्या भाषणातून अजितदादांचे राजकीय आणि सामाजिक कार्य विशद केले. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनीदेखील आपल्या भाषणातून अजितदादांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. यावेळी उच्च माध्य. शिक्षिका करुणा तांडेल, क्रीडाशिक्षक सुरेश पारखे, दर्शना माळी, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी, कु. दर्शना भोईर उपस्थित होते. अभिवादन सभेचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या उपशिक्षिका प्रतिज्ञा घरत यांनी केले.







**रिस : राज्याचे यशस्वी आणि लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त येथील मराठी शाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन जि.प. सदस्य नेहा भूषण पारंगे यांच्या हस्ते झाले. शिबिराला उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. यावेळी खालापूर पंचायत समिती सभापती लक्ष्मण पारंगे व अन्य मान्यवरांसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# वाजेकर विद्यालयात सायबर, महिला सुरक्षेचे धडे

**उरण : प्रतिनिधी**

वाढत्या सायबर गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत न्हावाशेवा पोलीस स्टेशनच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



सायबर सुरक्षा, अमली पदार्थांचा गैरवापर, महिला सुरक्षा आणि नवीन फौजदारी कायदे या विषयांवर भर देण्यात आलेल्या या कार्यक्रमात इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे व उपमुख्याध्यापिका संगीता थोरात या कार्यक्रमाला उपस्थित होते. न्हावा शेवा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सुमित केंद्रे, महिला पोलीस हवालदार कनिष्का नाईक, महिला पोलीस हवालदार सचिता म्हात्रे, पोलीस शिपाई विक्रम बारी आणि पोलीस शिपाई प्रेम पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पोलीस उपनिरीक्षक सुमित केंद्रे यांनी सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, अमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम, महिला सुरक्षा तसेच नव्या फौजदारी कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदी याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी या विषयांबाबत सजग राहून ही माहिती आपल्या कुटुंबीयांपर्यंत व समाजापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले. महिला पोलीस हवालदार सचिता म्हात्रे यांनी मुलींना वैयक्तिक सुरक्षितता, सायबर छळास प्रतिबंध व महिलांसाठी उपलब्ध असलेल्या हेल्पलाइन सेवांची माहिती दिली. गैरप्रकाराबाबत पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहनही केले.

# गव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली पर्यावरण रक्षणाची प्रतिज्ञा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इको क्लब फॉर मिशन लाईफ अंतर्गत जागतिक पर्यावरणात दिनाचे औचित्य साधून ५ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रातल्या अनेक शाळांमध्ये विविध उपक्रम 'एक पेड माँ के नाम' या शीर्षकाखाली राबविण्यात येत आहेत. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर पर्यावरण प्रतिज्ञा देण्यात येत आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील सर्व विद्यार्थ्यांनीही शनिवारी (दि. १८) 'पर्यावरण प्रतिज्ञा' केली.



कार्यक्रम विद्यालयाच्या इको क्लबचे प्रमुख प्रमोद करावकर यांच्या नियोजनुसार पार पडला. यावेळी उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, शशिकला पाटील, रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, सुरेश पारखे, संदीप भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आदी उपस्थित होते. करावकर यांनी यावेळी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता प्रतिपादित केली.

## संपादकीय

# एआयसंबंधी नियमांची नांदी

अँथ्रॉपिक या कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आघाडीच्या अमेरिकी कंपनीने कॉपीराइट प्रकरणात लेखक आणि प्रकाशकांसोबत तब्बल १.५ अब्ज डॉलर्सचा समझोता केला आहे. यातून केवळ एका कंपनीशी संबंधित कायदेशीर वाद संपलेला नसून हा जगभरातील एआय उद्योगासाठी महत्त्वाचा टप्पा म्हटला जातो आहे. भारताच्या दृष्टीनेही या घडामोडीकडे आपल्याला पहावे लागेल.

**गेल्या काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयसंबंधी कंपन्यांनी अब्जावधी शब्दांचा डेटा वापरून अत्यंत सक्षम भाषा मॉडेल विकसित केली आहेत. मात्र हा डेटा त्यांच्याकडे आला कुठून, त्यासाठी त्यांनी मूळ लेखक-प्रकाशकांची परवानगी घेतली का याविषयीचे प्रश्न सातत्याने उपस्थित केले जात होते. अँथ्रॉपिक प्रकरणाने या चर्चेला आता निर्णायक वळण दिले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलता यांच्यात संघर्ष असण्याची गरज नाही. उलट योग्य परवाना व्यवस्था आणि न्याय्य मोबदला यांच्या आधारे दोन्ही क्षेत्रे परस्परपूरक ठरू शकतात. लेखकांच्या हक्कांचे संरक्षण आणि तंत्रज्ञानातील नव्या कल्पना यांचा समतोल साधणे हे आगामी काळातील मोठे आव्हान असेल. एआय प्रशिक्षणासाठी साहित्याचा वापर हा काही परिस्थितींमध्ये 'फेअर यूज'च्या कक्षेत येऊ शकतो असे न्यायालयाने यापूर्वी अँथ्रॉपिक प्रकरणात नमूद केले होते. मात्र पायरसीद्वारे मिळवलेल्या पुस्तकांचा वापर हे निश्चितपणे कायद्याचे उल्लंघन असल्याचे आता न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यानंतर झालेला विक्रमी समझोता एआयच्या भविष्यातील विकासाची दिशा ठरवणार आहे. न्यायालयाने एआयच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा आणलेला नाही. परंतु बौद्धिक संपदा हक्कांकडे दुर्लक्ष करण्याची परवानगीही दिलेली नाही. याचा जागतिक परिणाम दूरगामी असेल. आता मोठ्या एआय कंपन्या अधिकृत परवाने घेणे, लेखक-प्रकाशकांशी महसूल वाटपाचे करार करणे आणि प्रशिक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या डेटाबाबत अधिक पारदर्शक धोरण स्वीकारणे पसंत करतील. यामुळे एआय उद्योगाचा खर्च वाढू शकतो. परंतु उद्योग अधिक विश्वासार्ह आणि कायदेशीरदृष्ट्या सक्षम होईल. छोट्या स्टार्टअप्सना मात्र असा खर्च पेलणे कठीण जाऊ शकते. त्यामुळे दर्जेदार आणि कायदेशीर डेटाचे महत्त्व वाढेल. जगातील सर्वाधिक डिजिटल वापरकर्ते, प्रचंड डेटा निर्मिती, वेगाने वाढणारी स्टार्टअप परिसंस्था आणि कुशल तंत्रज्ञांची मोठी फळी यांमुळे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात भारताकडे जगाचे लक्ष आहेच. विविध भारतीय भाषांमधली सामग्री भारतात उपलब्ध आहे. त्यामुळे या समझोत्यासंदर्भात भारतात संभवणारे परिणाम महत्त्वाचे असतील. एआय क्षेत्रात भारत वेगाने पुढे जात असताना भारतीय लेखक, वृत्तसंस्था, प्रकाशक आणि डिजिटल माध्यमांचे हक्क कसे जपायचे हा प्रश्न होताच. त्यावर आता निर्णायक चर्चा होईल. केंद्र सरकारने भारतीय भाषांमधील एआय विकासाला चालना देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. भारत हा केवळ एआय तंत्रज्ञानाचा वापर करणारा देश न राहता एआय तंत्रज्ञानाचा निर्माता आणि निर्यातदार देश बनायला हवा आहे. त्यासाठी स्वदेशी मॉडेल्स, भारतीय भाषांतील विश्वसनीय डेटा आणि त्यासंदर्भातील स्पष्ट नियमांची आवश्यकता असेल. भारतीय कॉपीराइट कायद्याचा एआयच्या संदर्भात पुनर्विचार करावा लागेल. भारतीय एआय स्टार्टअप्सनी सुरुवातीपासूनच परवानाधारक डेटावर आधारित मॉडेल विकसित करण्यावर भर दिल्यास त्यांना जागतिक बाजारपेठेत विश्वासार्हता मिळवता येईल. अँथ्रॉपिक प्रकरणातून जगभरातील धोरणकर्ते, न्यायव्यवस्था आणि तंत्रज्ञान कंपन्यांनी योग्य धडा घेतल्यास भविष्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक विश्वासार्ह आणि सर्व संबंधित घटकांसाठी अधिक न्याय्य ठरेल.**

# कर्जमुक्ती : शेतकऱ्यांची नवी सुरुवात

नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली आहे. ही योजना केवळ थकीत कर्ज माफ करण्यापुरती मर्यादित नसून, शेतकऱ्याला पुन्हा उभारी देत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा व्यापक प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पूर, रोगराई आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे शेतीचे गणित सातत्याने बिघडत आहे. त्यातच बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि इंधनाच्या वाढत्या खर्चामुळे शेती करणे अधिक खर्चिक बनले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी पीक कर्ज घेतो; मात्र नैसर्गिक किंवा बाजारातील प्रतिकूल परिस्थितीमुळे वेळेवर परतफेड करणे शक्य होत नाही. परिणामी तो नव्या कर्जासाठी अपात्र ठरतो आणि आर्थिक अडचणींचे चक्र अधिक गहिरे होत जाते.

याच पार्श्वभूमीवर शासनाने राबविलेली ही योजना शेतकऱ्याला नव्याने आर्थिक प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्याला पुन्हा पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, उत्पादनासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होईल आणि शेतीतील गुंतवणुकीला चालना मिळेल. त्यामुळे या योजनेकडे केवळ आर्थिक मदत म्हणून नव्हे,



तर कृषी क्षेत्राच्या पुनर्बांधणीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहण्याची गरज आहे.

या योजनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार करण्यात आला आहे. केवळ थकबाकीदारांना दिलासा देण्यापेक्षा आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. त्यामुळे कर्जमाफी आणि आर्थिक जबाबदारी यांच्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न या योजनेत दिसून येतो.

'एकवेळ समझोता' (One Time Settlement) ही तरतूदही अनेक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे. पूर्वी निर्धारित मर्यादेपेक्षा थोडे अधिक कर्ज असल्याने अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. आता शेतकरी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासनाकडून निश्चित मर्यादेपर्यंतचा लाभ मिळू शकणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेशी जोडले जाण्याची संधी उपलब्ध होईल.

कर्जमुक्तीचा परिणाम केवळ शेतकऱ्यापुरता मर्यादित राहत नाही. शेतकऱ्याच्या हातात आर्थिक तरलता निर्माण झाली की त्याचा लाभ खत-बियाणे विक्रेते, कृषी सेवा केंद्रे, कृषी अवजारे उत्पादक, वाहतूक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, प्रक्रिया उद्योग तसेच ग्रामीण बाजारपेठेला होतो. त्यामुळे शेतकऱ्याला दिलेला आर्थिक आधार म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळालेली नवी ऊर्जा होय.

या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यावर शासनाने भर दिला आहे. बँकांकडून पात्र लाभार्थ्यांची माहिती थेट शासनाच्या पोर्टलवर अपलोड केली जात आहे. आधार प्रमाणीकरण, अॅग्रीस्टॅक प्रणाली, संगणकीय पडताळणी, गावनिहाय लाभार्थी यादी आणि तक्रार निवारण यंत्रणा यामुळे लाभ वितरण अधिक अचूक आणि विश्वासार्ह होणार आहे. त्यामुळे पात्र शेतकरी वंचित राहणार नाहीत आणि अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्याची शक्यता कमी होईल.

शासनाचा दृष्टिकोन केवळ कर्जमाफीपुरता मर्यादित नाही. कर्जमाफी ही अंतिम उपाययोजना नसून शेतकऱ्याला स्वावलंबनाकडे नेणारी पहिली पायरी आहे. सिंचन सुविधा, कृषी पायाभूत सुविधा, पीक विविधीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे या दीर्घकालीन उपाययोजनांमुळे शेती अधिक सक्षम आणि शाश्वत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यामागेही एक अर्थपूर्ण संदेश आहे. लोककल्याण, जलव्यवस्थापन, शेती आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या या दूरदर्शी राज्यकर्तीच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाची योजना जाहीर करून शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला आधुनिक विकासदृष्टीची जोड दिली आहे.

आज शेतकऱ्याला सर्वाधिक गरज आहे ती आर्थिक दिलाशासोबत आत्मविश्वासाची. कर्जाचे ओझे हलके झाले की शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास, उत्पादन वाढविण्यास आणि शेतीकडे उद्योग म्हणून पाहण्यास अधिक सक्षम होतो. त्याचा सकारात्मक परिणाम उत्पादनक्षमता, ग्रामीण रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवरही दिसून येतो.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही केवळ कर्जमाफीची योजना नाही; ती शेतकऱ्याच्या नव्या सुरुवातीचा पाया आहे. शेतकऱ्याच्या श्रमांचा सन्मान, आर्थिक पुनर्बांधणी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासाचा व्यापक संकल्प या योजनेतून व्यक्त होतो. सक्षम शेतकरी, सक्षम शेती आणि बळकट ग्रामीण अर्थव्यवस्था यांवरच विकसित महाराष्ट्राची भक्कम पायाभरणी उभी राहणार आहे. त्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी पाऊल आहे.

**-जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**

# क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

चंद्रशेखर तिवारी, ज्यांना चंद्रशेखर आझाद म्हणून ओळखले जात असे, त्यांचा जन्म २३ जुलै १९०६, भाब्रा आता मध्य प्रदेश येथे झाला ते एक भारतीय क्रांतिकारी नेते आणि स्वातंत्र्यसैनिक होते.

किशोरावस्थेतच त्यांनी घर सोडले आणि बनारस येथील संस्कृत शाळेत शिक्षण घेतले. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ते भारतीय राष्ट्रीय चळवळीत ओढले गेले आणि महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत भाग घेतला. निदर्शनांना हजेरी लावली आणि वयाच्या १५व्या वर्षी पोलिसांनी त्यांना अटक केली आणि दंडाधिकाऱ्यांसमोर आणले. त्याने अधिकाऱ्यांना त्याचे नाव आझाद त्याच्या वडिलांचे नाव स्वतंत्र आणि पत्ता तुरुंग असे सांगितले. तो तरुण असल्याने तुरुंगातून सुटला परंतु पोलिसांनी त्याला जबर मारहाण केली. त्यानंतर त्याने आझादच्या बाजूने आपले आडनाव सोडले आणि कधीही जिवंत पकडले जाणार नाही असा निर्धार केला. त्यांना भारतीय लोकांमध्ये लोकप्रियता मिळाली.

चौरी चौरा येथे क्रांतिकारी जमावाने अनेक पोलिसांची हत्या केल्यानंतर फेब्रुवारी १९२२मध्ये गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्याने आझाद निराश झाले. स्वदेशी चळवळीदरम्यान उदयास येणाऱ्या अतिरेकी राष्ट्रवादाचा स्वीकार आझादने केला आणि अतिरेकी मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्याचा पुरस्कार केला.

हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल आणि पक्षाचे तीन प्रमुख नेते, रोशन सिंग, राजेंद्र नाथ लाहिरी आणि अशफाकुल्ला खान यांच्या मृत्युनंतर, त्यांनी हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनची पुनर्रचना हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या नवीन नावाने केली. काही काळासाठी आझादने झाशीला त्याच्या एचआरए संघटनेचे मुख्यालय बनवले. झाशीपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या ओरछाच्या जंगलात नेमबाजीचा सराव करत आणि एक तज्ञ निशानेबाज म्हणून इतर सदस्यांनाही शिकवत असे.

बराच काळ ते पं. हरिशंकर ब्रम्हचारी या टोपण नावाने सातार नदीच्या काठावरील हनुमान मंदिराजवळील झोपडीत राहत होते.

काकोरी कट रचणाऱ्यांपैकी आझाद हा एकमेव पळून गेला. तो झाशीला पळून गेला, जे १८५७ च्या भारतीय बंडाचे एक केंद्र होते, राणी लक्ष्मीबाई यांच्या नेतृत्वाखाली पळून गेलेला आझाद झाशीत तीन वर्षांहून अधिक काळ राहिला असे मानले जाते, ओरछाच्या जंगलात नेमबाजीचा सराव करत पोलिसांनी घेरल्यानंतर बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग न मिळाल्याने चंद्रशेखर आझाद यांनी २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबादमधील आझाद पार्क मध्ये स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्यात त्यांचा मृत्यु झाला.

(साभार इंटरनेट)




## सीसीटीव्हीत नेहमी लाल रंगाचाच लाईट का दिसतो?

आजच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने 'सीसीटीव्ही' कॅमेरा हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे. घरे, दुकाने, सोसायट्यांपासून



ते थेट सार्वजनिक ठिकाणांपर्यंत सगळीकडेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असते. पण, तुम्ही कधी विचार केला आहे का, की बहुतेक सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये नेहमी लाल रंगाचाच लाईट का चमकताना दिसतो? या लाल दिव्यामागे नेमकी कोणती जादू किंवा तंत्रज्ञान दडले आहे?

सीसीटीव्ही कॅमेऱ्यात असलेल्या लाल रंगाच्या एलईडी लाईटचा सर्वात मुख्य आणि महत्त्वाचा उद्देश म्हणजे लोकांना तुम्ही 'निगराणीखाली आहात' याची जाणीव करून देणे! जेव्हा एखादी व्यक्ती कॅमेऱ्यावर लाल लाईट पाहते, तेव्हा तिच्या लक्षात येते की तिच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले जात आहे. यामुळे चोरी, तोडफोड किंवा कोणताही अनुचित प्रकार करू इच्छिणारे गुन्हेगार अनेकदा आपला इरादा बदलतात. एका अर्थाने, हा लाल दिवा सुरक्षेचा थेट इशारा देण्याचे काम करतो.

विज्ञानानुसार, लाल रंग हा मानवी डोळ्यांना सर्वात आधी आणि अतिशय वेगाने आकर्षित करतो. अगदी दुरूनही हा रंग माणसाचे लक्ष सहज टिपून घेतो. याच कारणामुळे धोक्याच्या सूचना, वॉर्निंग सिग्नल आणि सुरक्षेशी संबंधित उपकरणांमध्ये प्रामुख्याने लाल रंगाचा वापर केला जातो. सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्येही लोकांना सतर्क करण्यासाठी आणि सावध राहण्याचा इशारा देण्यासाठीच लाल रंगाची निवड करण्यात आली आहे.

अनेक लोकांचा असा समज असतो की, कॅमेऱ्यात लाल दिवा लागला म्हणजे रेकॉर्डिंग सुरू आहे. मात्र, प्रत्येक वेळी असे असणे अजिबात गरजेचे नाही. बऱ्याच कॅमेऱ्यांमध्ये हा लाल दिवा फक्त कॅमेऱ्याला वीजपुरवठा मिळत असल्याचे दर्शवतो. काही मॉडेल्समध्ये रेकॉर्डिंग सुरू असताना ही एलईडी लाईट लुकलुकते. आजकाल बाजारात येणारे अनेक अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे कोणत्याही प्रकारचा लाईट न दाखवताही २४ तास अविरत रेकॉर्डिंग करत असतात.


असे अजिबात नाही की, सर्वच कॅमेऱ्यांना लाल लाईट असायला हवा. बँका, सरकारी कार्यालये आणि संवेदनशील सार्वजनिक ठिकाणी असे कॅमेरे बसवले जातात, ज्यात कोणताही लाईट नसतो. यामुळे कॅमेरा तिथे आहे हे सहजासहजी कोणाच्या लक्षात येत नाही.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हे वाक्य ऐकल्यावर बाळ गंगाधर टिळक आठवतात, लोकमान्य ही पदवीही त्यांना देण्यात आली होती . लोकमान्य म्हणजे लोकांनी स्वीकारलेला नेता. लोकमान्यांशिवाय त्यांना हिंदू राष्ट्रवादाचे जनक देखील म्हटले जाते.

ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पहिले लोकप्रिय नेते बनले. ते हिंदू म्हणून ओळखले जात होते. त्यांना राष्ट्रवादाचे जनक देखील म्हटले जाते. बाळ गंगाधर टिळक हे ब्रिटीश राजवटीत स्वराज्याचे पहिले आणि खंबीर पुरस्कर्ते मानले जातात. त्या काळात त्यांनी मराठी भाषेत नारा दिला, त्यांचा मराठी भाषेत दिलेला नारा आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच खूप प्रसिद्ध झाला. त्यांनी बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, अरविंद घोष, व्ही.ओ. चिदंबरम पिल्लई आणि मुहम्मद अली जिना यांच्यासह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक नेत्यांशी घनिष्ठ युती केली.

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात झाला. रत्नागिरी गावातून आधुनिक महाविद्यालयात शिक्षण घेतलेले



## निमित्त

ते भारतीय पिढीतील पहिले सुशिक्षित नेते होते. त्यांनी काही काळ शाळा-महाविद्यालयांमध्ये गणित शिकवले. ते इंग्रजी शिक्षणाचे टीकाकार होते. यामुळे ते भारतीय सभ्यतेचा अनादर शिकवते, असा त्यांचा समज होता. भारतातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दिशेनेही बरेच काम झाले आहे.त्यांनी इंग्रजीत मराठा दर्पण आणि मराठीत केसरी नावाची दोन दैनिके सुरू केली, टिळकांनी ब्रिटीश राजवटीच्या क्रौर्याबद्दल आणि भारतीय संस्कृतीच्या न्यूनगंडावर टीका केली होती. ब्रिटीश सरकारने ताबडतोब भारतीयांना पूर्ण स्वराज्य द्यावे, अशी त्यांची मागणी होती. केसरी या वृत्तपत्रात ते इंग्रजांविरुद्ध अतिशय आक्रमक लेख लिहीत असत. या लेखांमुळे त्यांना अनेकवेळा तुरुंगात पाठवण्यात आले. त्यांच्या 'केसरी' या पत्रात 'देशाचे दुर्दैव' असा लेख लिहिला होता, त्यात ब्रिटिश सरकारच्या धोरणांना विरोध करण्यात आला होता. यामुळे, त्यांना ७ जुलै १८९७ रोजी देशद्रोहासाठी अटक करण्यात आली. त्यांना मंडाले (ब्रह्मदेश) तुरुंगात ६ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली. त्यांची शिक्षा पूर्ण होण्यापूर्वीच त्यांच्या पत्नीचे निधन झाले. कारागृहातील एका पत्रावरून त्यांना ही बातमी कळली. ब्रिटीश सरकारच्या तुघलकी धोरणामुळे त्यांना त्यांच्या मृत पत्नीचे शेवटचे दर्शनही घेता आले नाही.

१९०८मध्ये टिळकांनी क्रांतिकारक प्रफुल्ल चाकी आणि खुदीराम बोस यांच्या बॉम्ब हल्ल्याचे समर्थन केले, ज्यामुळे त्यांना बर्मा मंडाले तुरुंगात पाठवण्यात आले. १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल आदरांजली वाहताना महात्मा गांधींनी त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हटले, जवाहरलाल नेहरूंनी त्यांना भारतीय क्रांतीचे जनक म्हटले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### तुळशीचे पाणी पिण्याचे अमृतासमान फायदे

प्राचीन काळापासून एक पवित्र वनस्पती म्हणून दारी राहणाऱ्या तुळशीला विशेष मान आहे. तुळशीचे औषधी गुणधर्मसुद्धा अनेक आहेत. अगदी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापासून ते श्वसनाच्या समस्या सोडवण्यापर्यंत अनेक प्रश्नावर तुळशीचे सेवन हे रामबाण उपाय ठरते.



तुळशीला डप्टोजेन मानले जाते, याचा अर्थ तुळस शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीमध्ये इम्युनोमोडयुलेटरी गुणधर्मदेखील असतात, याचा अर्थ ते शरीराची रोगप्रतिकारक प्रतिक्रिया वाढवू शकते. हे गुणधर्म संक्रमण आणि आजारांपासून लढण्यास मदत करू शकतात.

**तणावावर नियंत्रण**

तुळशीचे पाणी शरीराला शांत करू शकते, अंतर्गत हालचालींची लय संतुलित राहते. त्यामुळे ज्यांची जीवनशैली फार तणावग्रस्त आहे त्यांनी दिवसातून एकदा हे तुळशीचे पाणी प्यायल्यास फायदा होऊ शकतो.

**पचनाला मदत**

तुळशीमध्ये कार्मिनेटिव गुणधर्म असतात जे गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. काही अभ्यासांमध्ये असेही सुचवले आहे. यामुळे आतड्याचे कार्य सुधारू शकते, पचनास मदत होते.

**श्वसनासाठी मदत**

वर्षानुवर्षे तुळशीच्या पानांचा वापर खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या दूर करण्यासाठी केला जात आहे. तुळशीमध्ये कफनाशक गुणधर्म असतात, कफ बाहेर टाकण्यास आणि रक्त साचून गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. तुळशीचे दाहकविरोधी गुणधर्म घसा खवखवणे किंवा जळजळणाऱ्या श्वसननलिकेस शांत करू शकतात.

**अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस**

तुळशीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्ससारखे विविध अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढण्यास मदत करतात. तुळशीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक अँटिऑक्सिडंट्सचा पुरवठा वाढू शकतो ज्यामुळे अनेक आजरांपासून संरक्षण मिळू शकते. याविषयी अजून सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिरास प्रारंभ

**रायगड : जिमाका, प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या भव्य आरोग्य शिबिराचा उद्घाटन समारंभ आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हे आरोग्य शिबिर दि. २२ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले असून, नागरिकांना विविध आरोग्य सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मयुरी कांबळे, शिबिराचे नोडल अधिकारी डॉ. संतोष हराळकर, डॉ. सुधाकर बंटेवाड तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, विविध विभागांचे विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी, समाजसेवा अधीक्षक, परिचारिका, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगत आजारांचे लवकर निदान व वेळेवर उपचार होण्यासाठी अशा आरोग्य शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक नागरिकाने नियमित आरोग्य तपासणी करून स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत जिल्हाभर आयोजित करण्यात आलेल्या या विशेष शिबिरात रक्तदान शिबिर, स्तन कर्करोग तपासणी, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी, बोन मिनरल डेन्सिटी (बीएमडी) तपासणी तसेच नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर अशा विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या सर्व सेवा संबंधित विभागांमार्फत तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांनी केले.

दरम्यान, कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावी पद्धतीने करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी शिबिराबाबत समाधान व्यक्त करून प्रशासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे स्वागत केले.

# खोपोली-खालापुरात मुसळधार पाऊस; पाणी साचून जनजीवन विस्कळीत

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-खालापूर परिसरात गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतीच्या कामांवरही मोठा परिणाम झाला आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने भात लागवडीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. शेतकरी पावसाचा जोर ओसरल्यानंतरच लागवडीला पुन्हा वेग मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.



मागील २४ तासांत परिसरात दमदार पाऊस झाल्याने पाताळगंगा नदीसह लहान-मोठ्या नद्या, नाले आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. पाताळगंगा नदीची पाणीपातळी वाढली असली तरी ती अद्याप धोक्याच्या पातळीखाली असून महसूल प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. तहसील प्रशासनाने नागरिकांना नदीपात्र, धबधबे व पूरग्रस्त भागांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

खोपोली शहरातील हनुमान मंदिर पटांगण, डीसी नगर, शास्त्री नगर, खालची खोपोली तसेच इतर सखल भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती.

पनवेल-खोपोली, खोपोली-पाली आणि खोपोली-पेण या प्रमुख मार्गांवर काही ठिकाणी पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. मात्र मध्य रेल्वेची लोकल सेवा नियमित सुरू असल्याने नोकरदार वर्गाला मोठा दिलासा मिळाला. तालुक्यात अद्याप कोणतीही मोठी जीवित किंवा वित्तहानी झाल्याची नोंद नसली तरी सततच्या पावसामुळे सखल भागातील रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. महसूल, पोलीस, अग्निशमन विभाग तसेच आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या असून हेल्प फाउंडेशनसह विविध सामाजिक संस्थांचे स्वयंसेवकही मदतीसाठी सज्ज आहेत.

दरम्यान, हवामान खात्याने पुढील २४ तासांतही जोरदार पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडू नये.



**चौक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप खालापूर मंडळ आणि चौक जिल्हा परिषद विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. साई ब्लड बँक पनवेल व एमजीएम हॉस्पिटल कामोठे यांचे शिबिरास सहकार्य लाभले. आमदार महेश बालदी आणि पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे यांनी शिबिरास भेट दिली. यावेळी तालुका मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, ज्येष्ठ नेते विनोद भोईर, उद्योग आघाडी प्रमुख सागर ओसवाल, माजी उपसरपंच गणेश कदम, सुनील गायकवाड, प्रदीप गोंधळी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# वदपमध्ये यांत्रिकीकरणातून भात लागवडीचे प्रात्यक्षिक

**कर्जत : प्रतिनिधी**

सध्याची भातशेती मजूर मिळत नसल्याने आर्थिक दृष्ट्या खर्चिक बनली आहे. खर्चिक बनलेल्या भातशेती मध्ये आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर केला जावा आणि आर्थिक गणिते जुळवावीत यासाठी कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास कर्जत तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यांत्रिक पद्धतीने भात लागवडीची प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली व आधुनिक भातशेती तंत्रज्ञानाचा अनुभव घेतला. कोकण कृषी विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालय दापोली यांनी ग्रामीण जनजागृती कार्यानुभव कार्यक्रमात भात लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.



खरीप हंगामामध्ये भात हे कर्जत तालुक्यातील प्रमुख पीक असून, तालुक्यातील बहुतांश शेतकरी भातशेतीवर अवलंबून आहेत. मात्र, दिवसेंदिवस वाढणारी मजूरटंचाई, वाढता मजुरी खर्च, लागवडीसाठी लागणारा मोठा वेळ आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक पद्धतीने भात लागवड करणे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर यांत्रिकीकरणाचा स्वीकार हा काळाची गरज असून, शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भातशेती अधिक फायदेशीर व शाश्वत करण्याची आवश्यकता आहे.यासाठी कृषी विभागाकडून यांत्रिकीकरणाच्या सहाय्याने भातशेती करता यासाठी भात लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. संचालक अजित पाटील यांच्या प्रक्षेत्रावर यांत्रिक पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

# स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण



**कर्जत : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अजित पवार यांच्या जयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कर्जतमध्ये वृक्षारोपण व उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. राजिप माजी बांधकाम सभापती पुंडलिक पाटील यांनी स्व. पवार यांच्या आठवणी सांगितल्या.

यावेळी सुधाकर घारे, अशोक भोपतराव, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, ॲड. पूजा सुर्वे, मधुरा चंदन, नगरसेवक अशोक राऊत, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, कुमेश मोरे, नगरसेविका सुचिता खोत, नेहा शिंदे, अंजली कडू, सुमिता गायकवाड, राधिका पवार, माजी नगरसेवक बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, बिनिता घुमरे, भारती पालकर, सुवर्णा निलधे, पंकज पाटील, भानुदास पालकर, अनिल मोरे, राकेश देशमुख, राजू पवार, चेतन मुसळे, अतुल कडू, योगेश गायकवाड, स्वप्नील मुसळे, सुयोग मांडे आदी उपस्थित होते. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळवाटप करण्यात आले. सभापती नमिता घारे, माजी सभापती एकनाथ धुळे, जिप सदस्या उषा ठोंबरे, केतन बेलोसे, रवींद्र घारे, शेखर बैलमारे, संभाजी तवळे आदी उपस्थित होते.

# वृक्षारोपणातून जेएसएस रायगडचा स्वच्छता संदेश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जनशिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून स्वच्छता व वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणातून स्वच्छता नियंत्रण करणे शक्य असल्याचे मत कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली जे. एस. एस. रायगडच्या माध्यमातून १५ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येणार आहे.



## शुध्दीपत्रक क्र. १

**(ई-निविदा सुचना क्र. ११ सन २०२६-२७)**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. पवि/लेशा/निविदा/२७११, दि. १०.०७.२०२६**

**कामाचे नांव :-** १. Construction of Primary Health Centre At Gavhan Kopar, Tal-Uran, Dist.-Raigad.

| प्रसिध्द झालेले | सुधारीत वाचावे |
|---|---|
| १. ऑनलाईन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक १७/०७/२०२५ ते २४/०७/२०२६ (१८.००) वाजेपर्यंत | ऑनलाईन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक १७/०७/२०२६ ते २८/०७/२०२६ (१८.००) वाजेपर्यंत |
| २. निविदा पूर्व बैठक दिनांक २१/०७/२०२६ (१५.००) वाजता | निविदा पूर्व बैठक दिनांक २१/०७/२०२६ (१५.००) वाजता |
| ३. निविदा उघडण्याचा दिनांक २७/०७/२०२६ रोजी १५.०० वा. (शक्य झाल्यास) | निविदा उघडण्याचा दिनांक ३०/०७/२०२६ रोजी १५.०० वा. (शक्य झाल्यास) |

(सदर निविदेसूचनेमध्ये अथवा निविदेत काही बदल होत असल्यास खालील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)

१. http://mahatenders.gov.in

**जा.क्र. साबांवि/पनवेल/ई-निविदा/२०२६/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**दिनांक :-**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी१८५८

# रायगडातील ८,९१४ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर केली असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक (AgriStack) नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन रायगड जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक श्री. तनवीर पाटील यांनी केले आहे.

राज्य शासनाने दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ही योजना जाहीर केली असून, दि. १५ जुलै २०२६ रोजीच्या पूरक शासन पत्राद्वारे योजनेतील काही निकषांमध्ये सुधारणा करून काही अटी वगळण्यात आल्या आहेत. त्यामुळे अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत कर्ज घेतलेल्या ८,९१४ पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

पात्र लाभार्थ्यांची यादी लवकरच शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात येणार असून, ती संबंधित विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा, तलाठी कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध करून देण्यात येईल.

पात्र लाभार्थ्यांच्या यादीतील शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक क्रमांकासह 'आपले सरकार सेवा केंद्र', सीएससी (CSC) केंद्र किंवा जवळच्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

क्र. जन्म/रजि/एसआर /२०२६

श्री. शिवा विष्णु वाघमारे
मोहनवाडी. खोपोली, ता. खालापूर. जि. रायगड } **वादी**

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कलोते, ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

**विषय-जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री.शिवा विष्णु वाघमारे रा. मोहनवाडी खोपोली, ता. खालापुर.जि. रायगड (अपिलाथी) यांची बहिण के. सखू विठठल पवार यांचा मुत्यु दिनांक १५/०८/१९८५ रोजी मौजे विणेगाव कातळाचीवाडी, पो. वावंढळ ता. खालापूर, जि.रायगड येथे झाला आहे. सदर मुत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मुत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्यांचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली आहे.

**ठिकाण :- खालापूर**
**दिनांकः- २२/०७/२०२६**

शिक्का

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

क्र. जन्म/रजि/एसआर /२०२६

श्री. दगडू अनंत पवार
रा. कुशिवली. पो. गोरकामथ, ता. कर्जत. जि. रायगड } **वादी**

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कलोते, ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

**विषय-जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री.दगडू अनंत पवार रा. वदप कुशिवली. पो. गोरकामथ, ता. कर्जत. जि. रायगड (अपिलार्थी) यांची आई कै. रंजना अनंत पवार यांचा मुत्यु दिनांक ०८/०५/१९८३ रोजी मौजे विणेगाव कातळाचीवाडी, पो. वावंढळ ता. खालापूर, जि.रायगड येथे झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मुत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्यांचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली आहे.

**ठिकाण :- खालापूर**
**दिनांकः- २२/०७/२०२६**

शिक्का

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

क्र. मृत्यु /रजि/एसआर /२०२६

श्रीम. भारती भाऊ कदम
रा. वावंढळ, ता. खालापुर, जि. रायगड } **वादी**

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वावंढळ, ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

**विषय-जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्रीम. भारती भाऊ कदम, रा. वावंढळ, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे सासरे कै. अप्पाजी बाबुराव कदम यांच्या मुत्यु दिनांक ०२/१०/१९७२ रोजी वावंढळ, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मुत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस आज दि १३/७/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

**ठिकाण :- खालापूर**
**दिनांकः- १३/०७/२०२६**

शिक्का

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त
# बेलापूरमध्ये रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने भाजप, १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बेलापूर रेल्वे स्टेशन, सीवूड्स, सानपाडा आणि भाजप कार्यालय वाशी येथे बेलापूर विधानसभा महामंत्री निलेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले.

शिबिराची सुरुवात निलेश म्हात्रे यांनी स्वतः प्रथम रक्तदान करून केली. यावेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या रक्तदान उपक्रमामुळे समाजसेवेचा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला. भविष्यातही मतदारसंघात अशा लोकहिताच्या उपक्रमांचे आयोजन



करण्यात येणार आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि समाजात रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत युवक, महिला आणि विविध क्षेत्रातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. या शिबिरात ३५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यशस्वी आयोजनासाठी सर्व स्वयंसेवक, कार्यकर्ते, एमजीएम हॉस्पिटलचे वैद्यकीय पथक तसेच रक्तदात्यांचे आभार भाजप महामंत्री निलेश म्हात्रे यांनी व्यक्त केले.

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, संवादक अभिजित पेडणेकर, गोपाळराव गायकवाड, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, मंगेश चव्हाण, मालती सोनी, मुकुंद विश्वासराव, प्रताप भोसकर, महेश दरेकर, जयंत पाटील, प्रवीण भगत, प्रथमेश पाटील, दर्शन भारदवाज, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, मनीष बिजलानी, भूषण कोळी, मधुर कोळी, ज्ञानेश्वर कोळी, सुरेश कोळी, राजू कोळी, प्रभाकर कांबळे, अजय वर्मा, जयदेव ठाकूर, सुधीर पाटील, स्वरूप पाटील, निलेश पाटील, वैभव कदम, मनी कोणार, अजय पासवान, जयराम पासवान, गौरव जोशी, प्रमोद जोशी, विज्ञान म्हात्रे, हेमंत पाटील, कल्पेश कुंभार, अनिल विचारे यांसह नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त अजिवलीत आरोग्य शिबिर

## शेकडो नागरिकांनी घेतला लाभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अजिवली येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांना विविध आरोग्यसेवा तसेच उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीच्या सदस्या योगिता लहाने, भिंगार ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच योगेश लहाने, संजीवन गायकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. आरोग्य शिबिरात आलेल्या नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत रोगनिदान आणि वैद्यकीय सल्ला देण्यात आला. तसेच रुग्णांसाठी रक्त तपासणी, लघवी तपासणी आणि ईसीजी यांसारख्या आवश्यक चाचण्यांची सोय करण्यात आली होती.

शिबिरानंतर ज्या रुग्णांना पुढील उपचारांची गरज आहे, त्यांच्यासाठी आवश्यक त्या शस्त्रक्रियांचे नियोजनही करण्यात आले. यासोबतच शिबिरात मोफत औषधोपचार पुरवण्यात आले असून शासकीय आरोग्य योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा यासाठी नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड आणि आभा कार्ड काढून देण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. अजीवली आणि आसपासच्या परिसरातील शेकडो नागरिकांनी या शिबिराला उपस्थित राहून आरोग्यसेवांचा लाभ घेतला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महा ई-सेवा मेगा शिबिराचा विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिष्यवृत्ती व शुल्कमाफी समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २१) सकाळी ११ वाजता विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी "महा ई–सेवा मेगा शिबिर" यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले होते. यासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांनी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आवश्यक कागदपत्रांसाठी सहभाग नोंदविला. पनवेल तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या



उपस्थितीत २० विद्यार्थ्यांनी अधिवास व उत्पन्न प्रमाणपत्रांसाठी ऑनलाइन अर्ज सादर केले. सर्व अर्ज संबंधित शासकीय कार्यालयाकडे पाठविण्यात आले असून शासकीय कार्यवाहीनंतर संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांना शासकीय सेवांचा लाभ महाविद्यालयातच जलद मिळावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, श्रम व खर्चाची बचत झाली. तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली. या विद्यार्थीहिताच्या उपक्रमासाठी प्रा. विशाल देशमुख, प्रा. प्रथमेश ठाकूर, पनवेल तहसील कार्यालयातील अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शिष्यवृत्ती व शुल्कमाफी समिती, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व सहभागी विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# सीकेटी विद्यालयात इन्व्हेस्टिचर सेरेमनी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात बुधवारी (दि. २२) इन्वेस्टिचर सेरेमनी साजरा करण्यात आला. यावेळी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय खेळाडू असलेले देविदास पाटील , संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य राहुल घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

विद्यालयाच्या शिक्षिका प्राची इसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. इंग्रजी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करीत कार्यक्रमाचा हेतू सादर केला. यावेळी सर्व चारही कुलांनी (हाऊस) अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने



संचालन सादर केले. यावेळी सर्व कुलांच्या कॅप्टन, व्हॉईस कॅप्टन, मिनिस्टर आणि प्रिफेक्ट यांना त्यांचे बॅचेस प्रदान करण्यात आले.

प्रमुख पाहुणे देविदास पाटील यांनी मुलांना प्रोत्साहित करत आज मी जे काही आहे ते संघर्ष, मेहनत, शिस्त आणि स्वतःवरच्या विश्वासामुळे आहे. माझ्या आयुष्याने मला एक गोष्ट शिकवली की जिद्द, मेहनत आणि ध्येयावरचा विश्वास असेल तर कोणतीही मर्यादा तुम्हाला यशापासून रोखू शकत नाही, असे सांगून प्रत्येकाला आपापल्या करिअरमधील आवड जपण्याचा सल्ला दिला.

संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य राहुल घरत यांनी कार्यक्रमाचे कौतुक करीत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुलांना खेळामध्ये जास्तीत जास्त सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. माजी मुख्याध्यापक व शाळा निरीक्षक (ज. भ. शि. प्र.) संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी प्राथमिक मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पूर्व प्राथमिक (इंग्रजी) पर्यवेक्षिका वैशाली पारधी, क्रीडा विभागप्रमुख अशोक पाटील, क्रीडा इन्चार्ज नितीन म्हात्रे, प्रकाश रिसबूड, सर्व हाऊस इन्चार्ज, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तुराडे ग्रामपंचायतीत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी, डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमांचे अनावरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील ग्रामपंचायत तुराडे येथे महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी तसेच पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमेचे अनावरण सरपंच रंजना गायकवाड यांच्या हस्ते प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.



महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी व पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी सुरू केलेल्या श्री समर्थ बैठकीमुळे अनेक लोकांचे व्यसनमुक्ती होऊन अनेक संसार सावरले आहेत. तसेच आचरणात बदल झाल्याने वादविवाद संपवण्यात या परमार्थाची खूप मदत होऊन जीवनमान उंचावलेले दिसत आहे. त्यामुळे या प्रतिमा अनावरण झाल्याने त्यांच्या कार्याची शिकवण व आठवण होऊन अधिक प्रभावी कामे होतील व प्रेरणादायी ठरेल. या उद्देशाने हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगड जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे उपस्थित होत्या. त्यांच्या समवेत ग्रामपंचायत तुराडेच्या सरपंच रंजना गायकवाड, उपसरपंच लीना ठाकूर, माजी उपसरपंच मालती वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य विलासभाऊ पाटील, पूजा भोईर, सचिन मते, ग्रामविकास अधिकारी अस्मिता मोकल, रायगड जिल्हा परिषद शाळा तुराडेचे पाटील गुरुजी, रिया इंटरप्राईजेसचे प्रोप्रायटर प्रदीप माळी, उद्योजक संतोष वाघमारे, सतीश ठाकूर तसेच आशासेविका, अंगणवाडी सेविका, सुनील म्हात्रे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात अनन्या गाताडे म्हणाल्या की, मानवता हाच खरा धर्म आणि मनुष्य हीच एकमेव जात आहे, ही संतांची शिकवण प्रत्येकाने आपल्या आचरणात रुजवावी. समाजहितासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणे हीच खरी त्यांना आदरांजली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन ठाकूर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड यांनी मानले.

# नवी मुंबई महापालिकेत स्व. अजितदादांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे अभिवादन करण्यात आले. महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनीही प्रतिमापूजन करून अभिवादन केले. यावेळी प्रभाग समिती अध्यक्ष रूपाली भगत, शैला पाटील, पाणीपुरवठा समिती सभापती रविकांत पाटील, विधी समिती सभापती ॲड. सायली शिंदे, नगरसेविका ॲड. भारती पाटील, स्वीकृत नगरसेवक बंडू केणी तसेच प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक राजेंद्र गाडेकर, मालमत्ता कर विभागाचे उपआयुक्त डॉ. अमोल पालवे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, माजी नगरसेवक भरत जाधव यांच्यासह इंदर शेंडगे, प्रसाद घोरपडे, अश्विन अगमकर, अनिता नायडू, कविता शास्त्री, संतोष आहेर, किरण कारंडे, आदित्य ढेबे आणि इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचा जन्म दि. २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे झाला. आपले कर्तृत्व, निर्णयक्षमता, प्रशासनावरील पकड आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी, कणखर आणि लोकप्रिय नेता म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली. १९९१ मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून ते प्रथमच खासदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी बारामती विधानसभा मतदारसंघाचे सलग आठ वेळा प्रतिनिधित्व केले. स्व. अजित पवार यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून एकूण सहा वेळा कार्यभार सांभाळला. वित्त व नियोजन, जलसंपदा, ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क, अन्न व नागरी पुरवठा, अल्पसंख्याक विकास, क्रीडा व युवक कल्याण यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली.

राज्याचा अर्थसंकल्प त्यांनी ११ वेळा विधानमंडळात सादर केला. जुलै २०२२ ते जून २०२३ या काळात त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणूनही काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळात ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांचा विकास, पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करणे, औद्योगिक गुंतवणुकीला चालना, सिंचन प्रकल्पांना गती आणि विकासाभिमुख प्रशासकीय निर्णय यांना प्राधान्य देण्यात आले. प्रशासनातील त्यांची कार्यतत्परता आणि विकासाभिमुख दृष्टीमुळे राज्याच्या सर्वांगीण प्रगतीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. राजकीय वर्तुळात आणि जनसामान्यांमध्ये ते प्रेमाने 'अजितदादा' नावाने ओळखले जात. त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, शिस्तप्रिय स्वभाव आणि विकासासाठीच्या अखंड धडपडीमुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवला.




# विसपुते सभागृहात १५०० विद्यार्थ्यांना सीपीआरचे जीवनरक्षक प्रशिक्षण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने अपोलो हॉस्पिटल्स यांच्या सहकार्याने बुधवारी (दि. २२) दादासाहेब धनराज विसपुते सभागृहात हृदय–फुफ्फुस पुनर्जीवन (सीपीआर) प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

अपोलो हॉस्पिटल्समधील अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांनी हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत हृदय–फुफ्फुस पुनर्जीवन (सीपीआर)चे महत्त्व स्पष्ट करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व हाताळणीद्वारे विद्यार्थ्यांना जीवनरक्षक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीला योग्य प्रकारे प्रतिसाद देण्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

कार्यक्रमाला १५००हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला आहे. दरम्यान, धनराज विसपुते, सचिव संगीता विसपुते यांच्या प्रेरणा आणि सहकार्याने तसेच प्राचार्य डॉ. आशिष जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. दरम्यान, या उपयुक्त कार्यक्रमाच्या शेवटी अपोलो हॉस्पिटल्सच्या तज्ज्ञांचे, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे, प्राचार्य, प्राध्यापक, स्वयंसेवक तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# हार्मोन थेरपीकडे महिलांचा वाढता कल

**पनवेल : वार्ताहर**

चाळीशीनंतर महिलांमध्ये पेरिमेनोपॉजशी संबंधित तक्रारी वाढत असून वेळेवर निदान आणि उपचारांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. हार्मोनल आरोग्याबत वाढती जागरूकता आणि सोशल मीडियावरील माहितीमुळे अनेक महिला हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी या उपचार पद्धतीकडे वळत आहेत, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलच्या प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुरभी सिद्धार्थ यांनी सांगितले की, पेरिमेनोपॉज हा रजोनिवृत्तीपूर्वीचा संक्रमणकाळ आहे. या काळात इस्ट्रोजेन व प्रोजेस्टेरॉन हार्मोन्सचे प्रमाण कमी होऊ लागते. त्यामुळे अनियमित मासिक पाळी, हॉट फ्लॅशेस, रात्री घाम येणे, झोपेचा त्रास, मूड स्विंग्स, थकवा, चिंता आणि योनीमार्गातील कोरडेपणा अशी लक्षणे दिसू शकतात. उपचारांकडे दुर्लक्ष केल्यास हाडांची झीज, हृदयविकाराचा धोका आणि मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. त्यांच्या मते योग्य पद्धतीने दिलेल्या हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीमुळे लक्षणांवर प्रभावी नियंत्रण मिळते. झोप आणि मानसिक आरोग्यात सुधारणा होते तसेच जीवनमान उंचावते, मात्र उपचार प्रत्येक महिलेच्या वय, वैद्यकीय इतिहास आणि लक्षणांनुसारच ठरवले जातात. डॉ. सिद्धार्थ यांनी नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि ताणतणावाचे व्यवस्थापन यांचाही उपचारांमध्ये महत्त्वाचा वाटा असल्याचे स्पष्ट केले.

# नागोठण्यात मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

## तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, निदान आणि मार्गदर्शन

**नागोठणे : बातमीदार**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भारतीय जनता पक्ष दक्षिण रायगड यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे मुख्यमंत्री जनआरोग्य मोफत शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी केली. यामध्ये हाडांचे आजार, डोळ्यांची तपासणी, स्त्रीरोग तपासणी (गायनॅकॉलॉजी), जनरल फिजिशियन, कान-नाक-घसा (ईएनटी) तज्ज्ञांकडून तपासणी तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.



रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज भासल्यास रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांचे सहकार्य लाभणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी बोलताना अतिरिक्त रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी यांनी सांगितले की, संपूर्ण रायगड जिल्ह्यातील ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ५१ केंद्रांमध्ये मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर यशस्वीपणे राबविण्यात आले असून १६ शिबिरांमध्ये सुमारे दोन हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. आयुष्यमान भारत डिजिटल मिशनचा प्रारंभ महाराष्ट्रात सर्वप्रथम रायगडातून झाला असून रुग्णांसाठी पेपरलेस आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमध्ये रुग्णांच्या माहितीची गोपनीयता राखली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

भाजप जिल्हा सरचिटणीस शर्मिला पाटील यांनी सांगितले की, एमजीएम हॉस्पिटलच्या सहकार्याने रायगड जिल्हा निरोगी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जात आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती असून अशा शिबिरांमुळे गंभीर आजारांचे वेळेत निदान होऊन उपचार शक्य होतात. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी अशा आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा.

या शिबिरास अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी, एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथील मेडिकल सोशल वर्क विभाग प्रमुख रोहित मिसाळे व डॉक्टरांचे पथक, नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गंगाधर कल्याणकर, भाजपचे ज्येष्ठ नेते मारुती देवरे, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, किशोर म्हात्रे, भाजप व्यापारी सेल जिल्हाध्यक्ष सचिन मोदी, रोहा तालुकाध्यक्ष महेश ठाकूर, महामंत्री एकनाथ ठाकूर, आनंद लाड, तालुका अध्यक्षा अपर्णा सुटे, निखिल मढवी, राजेंद्र लवटे, सिराज पानसरे, अशोक अहिरे, गणेश घाग, विठोबा माळी, धनराज उमाळे, ज्ञानेश्वर शिर्के, प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक वंदन तांबोळी, आरोग्य सेविका, कर्मचारी तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खोपोली इनरव्हील क्लबतर्फे पूरग्रस्त संस्थेला मदतीचा हात

**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ खोपोली डिस्ट्रिक्ट ३१३तर्फे पूरग्रस्त बालग्राम भाजे संपर्क संस्थेतील मुलांसाठी आवश्यक मदत साहित्य देण्यात आले. पूरामुळे झालेल्या नुकसानीनंतर संस्था व तेथील मुलांना आवश्यक सहकार्य मिळावे या उद्देशाने हा सेवाप्रकल्प राबविण्यात आला.

या प्रकल्पांतर्गत सुमारे ३२ हजार रुपये किमतीचे विविध आवश्यक साहित्य देण्यात आले. यामध्ये २० किलो गहू पीठ, सात किलो खाद्यतेल, शेंगदाणे, वॉशिंग पावडर तसेच इतर आवश्यक किराणा साहित्याचा समावेश होता. याशिवाय ७० बेडशीट्स आणि ७० ब्लँकेट्सही देण्यात आले.

या सेवाप्रकल्पादरम्यान क्लबच्या अध्यक्ष राजेश्री मुंद्रा यांनी मुलांशी संवाद साधत अन्नाची नासाडी टाळण्याचे महत्त्व समजावून सांगितले तसेच मुलींना मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता व वैयक्तिक आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सेवाभावी उपक्रमास क्लबच्या अध्यक्ष सचिव दीपिका कोठारी, प्रकल्प प्रमुख माजी अध्यक्ष जयश्री कलोशी व वैशाली गांधी, सुलभा बिनीवाले, उपाध्यक्ष मधुमिता पाटील, माजी जिल्हा सदस्य क्षमा आठवले, तारा नायडू, जयश्री डोडिया तसेच निशा दळवी, सुमिता महर्षी, कविता सकपाळ, वर्षा शिवलकर आणि क्लबच्या इतर सदस्यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

क्लबच्या अनेक सदस्यांनी तसेच दानशूर व्यक्तींनी आर्थिक व वस्तुरूपाने योगदान दिले. देणगीदारांच्या सहकार्यामुळे हा सेवाप्रकल्प पूर्ण झाला.




## प्रकाश कोळी रोहा शिवसेना शहरप्रमुखपदी



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरातील युवा नेते प्रकाश कोळी यांची शिवसेना (शिंदे गट) शहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून हे पद रिक्त होते.

मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी यांच्या सूचनेनुसार जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर व रायगड लोकसभा मतदारसंघाचे प्रमुख अनिल नवगणे यांच्या आदेशानुसार प्रकाश कोळी यांची नियुक्ती झाली. पक्षनेतृत्वाने माझ्यावर दिलेली जबाबदारी मी इमानेईतबारे पार पाडून पक्षाला बळकटी देण्याचा प्रयत्न करतेन, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

# तळा ज्युनियर कॉलेजमध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**तळा : प्रतिनिधी**

तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या थाटामाटात झाला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आल्या.

या कार्यक्रमास नायब तहसीलदार श्री. पाटील, तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मंगेश देशमुख, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव महेंद्र कजबजे, खजिनदार चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्रीराम कजबजे, राजू सप्रे, माजी सरपंच जगन्नाथ तांडेल, आदी उपस्थित होते.


यावेळी सृष्टी दलाल, हुमेरा चिपळूणकर, संघमित्रा माळी, आफ्रिन गोठेकर आणि बिस्मा फटकारे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.



# विद्यार्थ्यांना चपला व वह्यांचे मोफत वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

हरीओम चॅरिटेबल असोसिएशन, श्रीमती वालीबेन जेठालाल छेडा आणि परिवार मुंबई तसेच रायगडभूषण कृष्णाजी महाडिक यांच्या सहकार्याने माणगाव, तळा व म्हसळा तालुक्यातील विविध माध्यमिक विद्यालये आणि जिल्हा परिषद शाळांमधील ११४३ विद्यार्थ्यांना मोफत चपला व वह्यांचे वाटप करण्यात आले.



विविध शाळांमध्ये आयोजित कार्यक्रमास हरीओम चॅरिटेबल असोसिएशनचे अध्यक्ष विजयराज नागरात, कृष्णा महाडिक, कुणाल,सनी, धनाजी, शिक्षक विनोद लाड तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच शालोपयोगी साहित्य आणि जीवनोपयोगी वस्तू मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथे आदिवासी समाज संघटनेच्या वतीने आयोजित दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आदिवासी बांधव, महिला, युवक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले आमदार महेंद्र थोरवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.



व्यासपीठावर आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, नयन वाघ, भास्कर देसले, जिल्हा परिषद सदस्य वर्षा दोरे-शेळके, पंचायत समिती सदस्य कविता पादिर यांच्यासह आदिवासी समाजातील प्रतिष्ठित नागरिक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच शेतकरी,शिक्षण, सामाजिक कार्य, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तरुणांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

## सुधागड वावे येथे तरुणाईकडून वृक्षारोपण

### रस्त्याच्या दुतर्फा १०० रोपांची लागवड; ग्रामस्थांचाही सहभाग

**पाली : प्रतिनिधी**

वाढते शहरीकरण आणि निसर्गाचा बिघडत चाललेला समतोल राखण्यासाठी ग्रामीण भागातील तरुण पिढी आता पुढे येत आहे. याचाच एक आदर्श वस्तुपाठ सुधागड तालुक्यातील वावे गावाने घालून दिला आहे. ग्रामस्थ मंडळ आणि युवाशक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरात एका विशेष वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या मोहिमेत वावे गाव ते सनशील्ड कंपनी आणि वावे गाव ते मजरे जांभूळपाडा बसस्टॉपदरम्यान रस्त्याच्या दुतर्फा तब्बल १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रत्येक वाटसरूला भविष्यात सावली मिळावी आणि परिसरातील पर्यावरणाचा समतोल उत्तम प्रकारे राखला जावा हा या वृक्षारोपणाचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी वड, पिंपळ, कडुनिंब यांसारख्या विविध सावली देणाऱ्या आणि पर्यावरणाला पूरक असणाऱ्या झाडांची निवड करण्यात आली होती. विशेष म्हणजे, वावे गावातील तरुण आणि तरुणी दरवर्षी न चुकता अशा प्रकारच्या पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण मोहिमा राबवत असतात. केवळ झाडे लावणे एवढ्यावरच न थांबता लावलेल्या झाडांचे पुढील काळात संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही ही युवाशक्ती अगदी मनापासून पार पाडते. हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी आहे.



## राजेश तरे अध्यक्षपदी



**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बोर्ली विभागात राहणारे कार्यकर्ते राजेश गजानन तरे यांची मुरुड तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आली आहे. या अगोदर ते संघटनेच्या सचिव पदावर कार्यरत होते.

राजेश तरे यांनी मुरुड तालुक्यातील विविध प्रश्न हाताळले आहेत. त्यांना मनसेचे रायगड संपर्क अध्यक्ष योगेश परूळेकर, जिल्हाध्यक्ष बाळा म्हात्रे, उपजिल्हा अध्यक्ष शैलेश खोत, महिला जिल्हाध्यक्ष छाया शिंदे यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. या नियुक्तीबद्दल पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तरे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुरुडमध्ये क्लिनिकच्या उद्घाटनानिमित्त आरोग्य उपक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड मधली आळीत डॉ. द्वारकानाथ वामन कर्णिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून एमबीबीएस डॉ. अक्षय डहाके यांनी संजोग क्लिनिक सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन येथील शासकीय रुग्णालयाचे माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. मकबूल कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. अनिकेत नारायण नवले (एमएस, ऑर्थोपेडिकस मुंबई), डॉ. राजाराम हुलवान, डॉ. नितीन गांधी, डॉ. राज केशरवाणी, डॉ. सचिन प्रजापती, डॉ. राजपाल, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे संजीवनी आरोग्य सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, ज्येष्ठ नागरिक सुनील मोहिले, लायन्स क्लब ऑफ मुरुडचे अध्यक्ष सनी सोगावकर, नवीन अध्यक्ष सी.एम. ठाकूर, वैद्यकीय शिक्षण विभाग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रमेश दिघे, अलिबाग येथील मुख्य प्रशासकीय अधिकारी जगन्नाथ नवले, प्रशासकीय अधिकारी यू.बी. डहाके, महाराष्ट्र अक्यूपंक्चर परिषदेचे रजिस्ट्रार नारायण नवले, नितीन नवले, अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्सचे प्राचार्य डॉ. साजिद शेख व राष्ट्रीय सेवा योजना, डीएलएलइ विभागाचे प्रमुख विद्यार्थ्यांसह उपस्थित होते.

या शुभारंभानिमित्त विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने आरोग्य सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लायन्स क्लब मुरूड-जंजिरा व लायन्स हेल्थ फाउंडेशन यांच्या वतीने मोफत नेत्रतपासणी शिबिर, तेरणा वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी, औषध वाटप तसेच उज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी फाउंडेशनच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या वतीने उज्वला चंदनशिव यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य जनजागृती व योगाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

## जाकीर अली हमदुले यांची सभापतीपदी बिनविरोध निवड

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ लि. मांडला संस्थेच्या सभापतीपदी जाकीर अली हमदुले यांची बिनविरोध निवड झाली. मांडला येथील मरहूम भाईसाहेब घय्ये सभागृहात मंगळवारी सभापतीपदाची निवड घेण्यात आली.

मुरूड-जंजिरा सहकार अधिकारी प्रमोद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या निवडणुकीस मॅनेजर अरूण घरत यांचे सहकार्य लाभले. रिक्त असलेल्या सभापतीपदासाठी संचालक जाकीर अली हमदुले यांच्या ऐकमेव अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक अधिकारी वाघमारे यांनी हमदुले यांची बिनविरोध निवड जाहीर केली.



या निवडणुकीसाठी उपसभापती रफायल वेगस, संचालक संतोष कांबळी, प्रदीप धनावडे, यास्मीन घय्ये, संचालक फैयाज हुसेन दळवी, लक्ष्मी थळे, निस्सार नाईक, तज्ञ संचालक मंगेश थळे व मॅनेजर गुरव यांनी प्रक्रियेत सहभाग घेतला. सर्वांनी हमदुले यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

यावेळी सभापतीपदाच्या बिनविरोध निवडीबद्दल आनंद व्यक्त करून संस्थेचे कामकाज जबाबदारीने करून नावलौकिकात भर पडेल असे कार्य करण्याचा मनोदय हमदुले यांनी व्यक्त केला.

# कॉमनवेल्थ गेम्ससाठी भारतीय संघ जाहीर

## १२६ खेळाडूंचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदा कॉमनवेल्थ गेम्स २०२६ संक्षिप्तपणे खेळली जाणार आहे. त्यासाठी भारताने १२६ सदस्यीयांची यादी जाहीर केली आहे. यात ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, ज्युडो, वेटलिफ्टिंगसह पॅरा ॲथलेटिक्स, पॅरा जलतरण, पॅरा ट्रॅक सायकलिंग आणि पॅरा पॉवरलिफ्टिंग अशा एकूण नऊ क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहे.

यंदाच्या कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेतून अनेक खेळ कमी करण्यात आल्याने भारताच्या पदकसंख्येला याचा मोठा फटका लागणार आहे. यंदा १९पैकी १० खेळांचा समावेश करण्यात आला आहे, तर खेळाडूंच्या संख्यामध्ये मोठे असलेले खेळ यावेळी वगळण्यात आले आहेत. यात क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, स्क्वॉश, टेटे, डायव्हिंग, रग्बी, नेमबाजी हे खेळ आहेत. हे मोठे खेळ कमी झाल्याने भारताचे पाच-सहा खेळांमधील पदक कमी झाले आहेत.




यंदाच्या संघात दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेता नीरज चोप्रा, ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती बॉक्सर लव्हलिना बोर्गोहेन आणि टोकियो ऑलिम्पिकची रौप्यपदक विजेती मीराबाई चानू यांच्यासारखे स्टार खेळाडू संघाचे नेतृत्व करणार आहेत. स्पर्धेसाठी ॲथलेटिक्समध्ये सर्वाधिक ३२ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यानंतर बॉक्सिंग आणि ज्युडो या दोन्ही प्रकारांमध्ये प्रत्येकी १४ खेळाडूंना संधी मिळाली आहे, तर वेटलिफ्टिंगसाठी १२ सदस्यीय संघ निवडण्यात आला आहे.

**भारतीय संघ**

**ॲथलेटिक्स** : नीरज (चोप्रा भालाफेक), तेजस्विन शंकर डेकॅथलॉन (उंच उडी), गुरिंदरवीर सिंग (१०० मीटर धावणे), अनिमेष कुजूर (२०० मीटर धावणे), पारुल चौधरी (३००० मीटर), स्टीपलचेस (५००० मीटर), एम. श्रीशंकर (लांब उडी), पूजा सिंग (उंच उडी), मनप्रीत कौर (गोळाफेक), सीमा कालिरामना, निधी राणी (थाळीफेक), सर्वेश कुशारे, आदर्श राम (उंच उडी), प्रवीण चित्रावेल, सेल्वा प्रभू (तिहेरी उडी), लोकेश सत्यानाथन (लांब उडी), रवीना, प्रियांका गोस्वामी (रेस वॉक), रशदीप कौर, नीरू पाठक, अन्सा बाबू, विशाल टी.के., राजेश रमेश (४०० मीटर) तेजस शिर्से (११० मीटर अडथळा शर्यत), यशस पलाक्षा, संतोष टी (४०० मीटर अडथळा शर्यत), देव मीणा, कुलदीप कुमार (पोल व्हॉल्ट), रोहित यादव, यशवीर सिंग (भालाफेक), तजिंदरपाल सिंह तूर, समरदीप सिंग गिल (गोळाफेक).

**बॉक्सिंग** : साक्षी चौधरी ५१ किलो, प्रीती पवार ५४ किलो, जदुमणी सिंह ५५ किलो, जैस्मिन लांबोरिया ५७ किलो, प्रिया घंघास ६० किलो, सचिन सिवाच ६० किलो, पर्वीन हुड्डा ६५ किलो, आदित्य प्रताप सिंह ६५ किलो, अरुंधती चौधरी ७० किलो, सुमित कुंडू ७० किलो, लव्हलिना बोर्गोहेन ७५ किलो, अंकुश ८० किलो, कपिल पोखरिया ९० किलो, नरेंद्र बेरवाल ९० किलोपेक्षा अधिक (+९० किलो).

**वेटलिफ्टिंग** : मीराबाई चानू, ज्ञानेश्वरी देवी, बिंदियाराणी देवी, हरजिंदर कौर, संजना, मार्टिना देवी, ऋषिकांत सिंह, एम. राजा, अजया बाबू, दिलबाग सिंह, लव्हप्रीत सिंह.

**ट्रॅक सायकलिंग** : रोनाल्डो सिंह, डेव्हिड बेकहॅम, रोजित सिंह, दिनेश कुमार, जेमेश सिंह, हर्षवीर सेखोन.

**जलतरण** : अनीश गौडा, साजन प्रकाश, श्रीहरी नटराज, आर्यन नेहरा, धर्शन शशिकुमार.

### स्पर्धा नव्या स्वरूपात

यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद स्कॉटलंडमधील ग्लासगो शहराकडे आले आहे. २३ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत पार पडणाऱ्या या क्रीडा महाकुंभात सुमारे १२४ भारतीय खेळाडूंचे पथक सहभागी होणार आहेत. स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा २३ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार रात्री १०.३० वाजता पार पडेल. नव्या आणि संक्षिप्त स्वरूपानुसार यंदा १० प्रमुख क्रीडा प्रकार आणि एकूण २१५ पदकांच्या शर्यती निश्चित करण्यात आल्या आहेत.

# झिम्बाब्वे दौऱ्यात वैभव सूर्यवंशीला इतिहास रचण्याची संधी

## कमी डावांत षटकारांचा विश्वविक्रम खुणावतोय!

**हरारे : वृत्तसंस्था**




इंग्लंड दौऱ्यात अपेक्षित कामगिरी करता न आल्याने युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी आता झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० मालिकेत दमदार पुनरागमन करण्याच्या तयारीत आहे. इंग्लंडविरुद्धच्या तीन टी-२० सामन्यांत त्याला केवळ ४२ धावा करता आल्या होत्या. त्यामुळे आगामी मालिकेत मोठी खेळी करून स्वतःला सिद्ध करण्याचे त्याच्यासमोर मोठे आव्हान आहे.

झिम्बाब्वेविरुद्ध २३, २५ आणि २६ जुलै रोजी हरारे येथे होणाऱ्या तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेत वैभवकडे एक मोठा विश्वविक्रम करण्याची संधी आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावांत १५० षटकार पूर्ण करणारा फलंदाज बनण्यासाठी त्याला या मालिकेत आणखी ११ षटकारांची गरज आहे. सध्या त्याच्या नावावर ३७ डावांत १३९ षटकारांची नोंद आहे.

सध्या हा विक्रम संयुक्त अरब अमिरातीचा फलंदाज मोहम्मद वसीमच्या नावावर आहे. त्याने ६६ डावांत १५० षटकारांचा टप्पा गाठला होता. त्यानंतर वेस्ट इंडिजचा एविन लुईस (७० डाव) आणि ख्रिस गेल (७२ डाव) यांचा क्रमांक लागतो. वैभवने या मालिकेत ११ षटकार मारले, तर तो अवघ्या ४० डावांत १५० षटकार पूर्ण करत या दिग्गजांना मागे टाकू शकतो.

इंग्लंड दौऱ्यानंतर वैभवने आपल्या खेळातील कमतरता दूर करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. राजस्थान रॉयल्सच्या सराव शिबिरात त्याने शॉर्ट बॉलविरुद्ध फलंदाजीवर अधिक भर दिला. इंग्लंडमध्ये तो अनेकदा अशाच चेंडूवर बाद झाला होता. त्यामुळे झिम्बाब्वे दौऱ्यात त्याच्या या तयारीचा किती फायदा होतो याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

## फुटबॉल रेफरी अँथनी टेलर निवृत्त

**लंडन :** नुकत्याच झालेल्या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत पंच म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणारे प्रसिद्ध इंग्लिश रेफरी अँथनी टेलर यांनी आपल्या निवृत्तीची घोषणा केली आहे. तब्बल २० वर्षांची दीर्घ सेवा आणि ८००हून अधिक सामन्यांचे यशस्वी संचालन केल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतला. ४७ वर्षीय टेलर यांनी १४ वर्षे फिफाच्या आंतरराष्ट्रीय यादीत समाविष्ट होते.

# आशियाई लेजेंड्स लीग सीझन २ क्रिकेट स्पर्धा ३० जुलैपासून

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई लेजेंड्स लीगचा बहुप्रतीक्षित दुसरा सीझन जगभरातील क्रिकेटप्रेमींना मंत्रमुग्ध करण्यासाठी सज्ज झाला आहे. ३० जुलै ते १० ऑगस्टदरम्यान झाम्बियाच्या लुसाका येथे ही स्पर्धा पार पडणार आहे.

आशियाई क्रिकेटमधील काही सर्वात प्रतिष्ठित नावांच्या नेतृत्वाखाली हे संघ मैदानात उतरतील. युसूफ पठाण इंडियन रॉयल्सचे नेतृत्व करेल, तर थिसारा परेरा श्रीलंका लायन्सचे प्रतिनिधित्व करेल. शाकिब अल हसन बांगलादेश टायगर्सकडून, असगर अफगाण अफगाणिस्तान पठाण्सकडून, मोहम्मद हाफिज पाकिस्तान पँथर्सकडून आणि तिलकरत्ने (टीएम) दिलशान रेस्ट ऑफ आशियान स्टार्सचे कर्णधारपद भूषवणार आहे.

या स्पर्धेची रंगत वाढवण्यासाठी अंबाती रायडू, नमन ओझा, ऋषी धवन, उपुल थरंगा, इसुरु उडाना, धनुष्का गुणतिलका, दिलशान मुनावीरा, असेला गुणरत्ने, इम्रान नझीर, सईद अजमल, उमर अकमल, यासिर शाह, मोहम्मद इरफान, अलोक कपाली आणि सिरिवर्दना यांसारखे अनेक नामवंत माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत. आगामी दिवसांमध्ये आणखी काही दिग्गजांची नावे जाहीर होण्याची शक्यता आहे.

**सहा संघांमध्ये घमासान**

आशियातील काही सर्वात मोठ्या क्रिकेट राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सहा देश-आधारित फ्रँचायझी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यामध्ये इंडियन रॉयल्स, श्रीलंका लायन्स, बांगलादेश टायगर्स, अफगाणिस्तान पठाण्स, पाकिस्तान पँथर्स आणि रेस्ट ऑफ आशियान स्टार्स या संघांचा समावेश आहे. पहिल्या पर्वाला मिळालेल्या अभूतपूर्व स्पंदनानंतर ही लीग आता अधिक मोठ्या मंचावर परतत आहे. यात सहा स्पर्धात्मक संघ, दिग्गज आशियाई आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आणि थरारक टी-२० फॉरमॅट पाहायला मिळणार आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त पैलवान दत्तक उपक्रमाचा शुभारंभ

## ११ होतकरू मल्लांना शिष्यवृत्ती, मानधन आणि क्रीडा साहित्य

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्राच्या मातीने देशाला असंख्य मल्ल दिले; मात्र गरिबीमुळे अनेक गुणी पैलवानांची स्वप्ने आखाड्याबाहेरच थांबली. हीच परंपरा मोडून काढण्याचा निर्धार करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त युनायटेड रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (युडब्ल्यूएफआय) आणि देवाभाऊ केसरी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पैलवान दत्तक योजना २०२६-२७ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते मंगळवारी मलबार हिल येथील सेवा सदन बंगल्यावर शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील ११ होतकरू पैलवानांना दत्तक घेत त्यांना शिष्यवृत्ती, मानधन आणि क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्राच्या कुस्तीला नवे बळ देणाऱ्या या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींमुळे मागे पडणाऱ्या प्रतिभावान मल्लांच्या स्वप्नांना आता भक्कम आधार मिळणार आहे.

कार्यक्रमास युनायटेड रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष काझी अब्दुल मतीन, सचिव दत्तात्रय जाधव, देवाभाऊ केसरी फाउंडेशनचे अध्यक्ष रोहित पटेल यांच्यासह ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव (पोलीस उपायुक्त, मुंबई) व विजय चौधरी (सहाय्यक पोलीस आयुक्त, नवी मुंबई), डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

**भविष्यात ५० पैलवान दत्तक घेण्याचा मानस**

या योजनेत सोहम सुनील कुंभार, ज्ञानवी अर्जुन पाटील, संग्राम नितीन खुर्द, रणवीर समिंदर जाधव, श्रीकर भास्कर नायकवडी, वैष्णवी शंकर पाटील, वीरेन अरुण पाटील, हर्षल आनंद घाटके, विश्वजीत धर्मेंद्र सावंत, पियुष दादासो शेवाळे आणि व्यंकटेश चोरगे या ११ होतकरू पैलवानांची निवड करण्यात आली. आर्थिक आधारासह दर्जेदार प्रशिक्षणासाठी हा उपक्रम त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. उद्योग क्षेत्र, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने भविष्यात ५० पैलवान दत्तक घेण्याचा मानस असल्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

# मेक्सिकन दिग्गज गोलरक्षक गिलेर्मो ओचोआची निवृत्ती

**मेक्सिको सिटी :** फुटबॉल जगतातील सर्वोत्कृष्ट मेक्सिकन गोलरक्षकांपैकी एक मानल्या जाणाऱ्या फ्रान्सिस्को गिलेर्मो ओचोआ मागाना याने व्यावसायिक फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे. वयाच्या ४१व्या वर्षी त्यांनी आपल्या तब्बल २२ वर्षांच्या गौरवशाली कारकिर्दीला पूर्णविराम दिला.

ओचोआची तब्बल सहा विश्वचषकांसाठी मेक्सिकोच्या संघात निवड झाली होती. ही संस्मरणीय कामगिरी केवळ फुटबॉल जगतातील दिग्गज ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनेल मेस्सी यांच्या पंक्तीत बसणारी आहे.

# पनवेलच्या फॉस्टिना फर्नांडोची कराटे स्पर्धेत 'सुवर्ण' कामगिरी

## आशियाई स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील न्यू बॉम्बे कराटे क्लबची खेळाडू फॉस्टिना फर्नांडो हिने बांगलादेशातील ढाका येथे आयोजित दहाव्या साऊथ एशियन कराटे अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. या आंतरराष्ट्रीय यशानंतर फॉस्टिनाची जॉर्डन येथे होणाऱ्या आगामी आशियाई कराटे अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

साऊथ एशियन कराटे अजिंक्यपद स्पर्धेत भारतासह बांगलादेश, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका, भूतान आणि मालदीव या दक्षिण आशियाई देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत फॉस्टिनाने कॅडेट मुलींच्या +६१ किलो कुमिते गटात सुवर्णपदक जिंकले.

या यशाबद्दल न्यू बॉम्बे कराटे क्लबचे अध्यक्ष रोहन यादव, संचालक बिपिन राय, अमेरिकन जपान कराटे असोसिएशन इंटरनॅशनलचे रिप्रेझेंटेटिव्ह योगेश कांबळी तसेच उमंग स्पोर्ट्स ॲण्ड कल्चरल असोसिएशन अकादमीचे अध्यक्ष अभिषेक चव्हाण यांनी फॉस्टिनाचे अभिनंदन करून आशियाई स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याचबरोबर राज्यसभा खासदार संगीता यादव यांनीही फॉस्टिनाला शुभेच्छा दिल्या.

# उरण येथे 'आरडीसीए'चे दुसरे पंच प्रशिक्षण शिबिर उत्साहात

## क्रिकेट नियमांबाबत शिबिरार्थींना मार्गदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) वतीने उरण म्हातवली येथील माऊली कृपा हॉलमध्ये दुसऱ्या पंच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. येत्या ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे (एमसीए) होणाऱ्या मुख्य पंच परीक्षेसाठीच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण शिबिर उपयुक्त ठरणार आहे.

रायगड जिल्ह्यातील १४ परीक्षार्थी मुख्य पंच परीक्षेसाठी पात्र झाले असून त्यांना क्रिकेट नियमांचे सखोल मार्गदर्शन करण्यासाठी एमसीसी लॉ तज्ज्ञ नयन कट्टा, माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआय पंच हर्षद रावले, बीसीसीआयचे पंच रूपेश खडगी, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे उपस्थित होते.

शिबिरासाठी डी.के. भोईर यांनी आपला माऊली कृपा हॉल विनामूल दिला, तर शिबिराची संपूर्ण जबाबदारी प्रशांत माळी यांनी यशस्वीरित्या पार पाडली. ऑगस्ट महिन्यात एमसीएच्या वतीने घेण्यात येणाऱ्या मुख्य परीक्षेसाठी आरडीसीचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या आहेत.



# ग्रामीण भागात पारंपरिक खेळांमध्ये रमताहेत मुले



**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला की ग्रामीण भागातील वातावरणाला एक वेगळीच रंगत येते. शेतामध्ये हिरवाई पसरते, ओढे-नाले वाहू लागतात आणि गावातील मोकळ्या मैदानांवर मुलांच्या खेळांचा जल्लोष सुरू होतो. मोबाईल, टीव्ही आणि व्हिडिओ गेमच्या युगातही ग्रामीण भागातील मुले आजही पारंपरिक खेळांची परंपरा जिवंत ठेवताना दिसत आहेत.

कबड्डी, सूरपाट्या, लगोरी, लंगडी, विट्टीदांडू, खो-खो, गोट्या, गाडा (टायर) यांसारखे खेळ कोणत्याही महागड्या साधनांशिवाय खेळले जातात. त्यामुळे प्रत्क मुलाला सहजपणे या खेळांचा आनंद घेता येतो. विशेष म्हणजे पारंपरिक खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम होतो. त्याचबरोबर एकाग्रता, चपळाई, संयम, सांघिक भावना, नेतृत्वगुण, मैत्री आणि स्पर्धात्मक वृत्ती यांचा विकास होतो. निसर्गाच्या सान्निध्यात खेळल्यामुळे मुलांचे मानसिक आरोग्यही सुदृढ राहण्यास मदत होते.



आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि ऑनलाइन गेम्सचे आकर्षण वाढले असले, तरी ग्रामीण भागातील अनेक मुले अजूनही पारंपरिक खेळांना प्राधान्य देताना दिसतात. पारंपरिक खेळ हे केवळ विरंगुळ्याचे साधन नसून ते ग्रामीण संस्कृतीचे जिवंत प्रतीक, निरोगी जीवनशैलीचा पाया आणि बालपणातील आनंदाचा अमूल्य ठेवा आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com